# बचत गटासाठी...

## कार्यक्षम व्यवस्थापन

## प्रशिक्षण पुस्तिका




अर्थसहाय्य
नाबार्ड, पुणे

ज्ञान प्रबोधिनी, पुणे.

''गरिबांमध्ये स्त्रिया या 'अधिक गरीब' असतात.
कुटुंबाच्या उदर निर्वाहात
स्त्रियांची मिळकत ही खूप महत्त्वाची ठरते.
जो पर्यंत स्त्रियां दुर्बल राहतील
तो पर्यंत आपल्या देशातील दारिद्र्य
कधीच हटणार नाही.
भांडवल व रोजगारा प्रमाणेच
ज्ञान ही सुद्धा शक्ती आहे. म्हणूनच
महिलांनी सूक्ष्मऋण कार्यक्रमाच्या
मुख्य प्रवाहात असायलाच हवं.
त्यांनी नुसतं त्या कार्यक्रमाचं
'ग्राहक' असून चालणार नाही,
तर त्यांचे नेतृत्व विकसन आणि
स्थानिक पातळीवर त्यांच्या
क्षमतांचा गुणाकार हीच
आजच्या काळाची मागणी आहे.
तरच त्या
निर्णय घेण्याच्या मुख्य प्रवाहात येतील.''

इलाबेन भट्ट
चेअरपर्सन
इंडियन स्कूल ऑफ मायक्रोफायनान्स फॉर विमेन

(इंडियन स्कूल ऑफ मायक्रोफायनान्स फॉर विमेन
वार्षिक अहवाल ०५-०६ मधून साभार)

# बचत गटासाठी

# कार्यक्षम व्यवस्थापन प्रशिक्षण पुस्तिका

## गट सभासद, गट प्रमुख, संघटिका यांचे प्रशिक्षण


**ज्ञान प्रबोधिनी**

**ग्राम विकसन विभाग**

५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

**प्रकाशक :**
श्री. वि. शं. / सुभाष देशपांडे
कार्यवाह
**ज्ञान प्रबोधिनी,**
५१० सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०
☎ (०२०) २४४९ १९५७, २४२० ७०००, २४२० ७१६२
www.org

**मुद्रक :**
प्रबोध उद्योग
१२४८ शुक्रवार पेठ,
सुभाषनगर गल्ली क्र. ५,
पुणे – ४११ ००२

**लेखन :**
सुवर्णा गोखले, बागेश्री पोंक्षे
**ज्ञान प्रबोधिनी,** ग्राम विकसन विभाग
५१० सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०

© सर्व हक्क प्रकाशकांचे स्वाधीन

**प्रथम आवृत्ती :**
नवरात्र, शके १९२९
(ऑक्टोबर २००७)
**द्वितीय आवृत्ती : आषाढी एकादशी, १९३२**
(जुलै २०१०)

**किंमत : रुपये १००/– मात्र**

# प्रस्तावना

महिला सक्षमीकरणासाठी काम करणाऱ्या शासकीय अथवा स्वयंसेवी संस्था यांना बचत गट हे एक महत्त्वाचे माध्यम गेल्या काही वर्षांमध्ये गवसले आहे. शहरी अथवा ग्रामीण गरीब महिलांमध्ये काम करताना शासकीय अधिकाऱ्यांना अथवा स्वयंसेवी संस्थेच्या कार्यकर्त्यांना आर्थिक विषय समजावून सांगण्यासाठी बरीच कसरत करावी लागते. साक्षरतेचे प्रमाण जेथे कमी आहे आणि शिक्षण सोडून बरीच वर्षे जेथे झाली आहेत, तेथे आकडेमोड शिकविण्यासाठी बराच खटाटोप करावा लागतो.

मात्र असा खटाटोप न करता गटांची संख्या वाढवत गेलो, तर त्यातून नवे प्रश्न तयार होतात. त्यामुळे विविध स्तरांना प्रशिक्षण देणे आवश्यक ठरते. असे प्रशिक्षण कोणाकोणाला दिले पाहिजे, त्यात काय शिकविले पाहिजे, हे लक्षात घेऊन ही त्रिस्तरीय प्रशिक्षण पुस्तिका तयार झाली आहे. ज्ञान प्रबोधिनी संस्थेच्या दोघी कार्यकर्त्यांनी १२ वर्षांच्या अनुभवान्ती या पुस्तिकेची रचना केली आहे.

ही प्रशिक्षण पुस्तिका हाताळण्यास सोपी, वापरण्यास सुटसुटीत व बव्हंशी आकडेमोडीची सवय अल्प प्रमाणात असलेल्यांसाठी बेतलेली आहे. बचतगटाच्या सभासद महिला यांचे प्रशिक्षण त्यात पायाभूत आहे.व्यवहार कागदावर मांडावयास शिकताना कोणती आर्थिक शिस्त पाळली तर ते त्यांच्याच फायद्याचे आहे, त्याचे दिग्दर्शन त्यात केले आहे. सध्याच्या गटांच्या संख्यावाढीच्या रेट्यात गटाची भक्कम अस्मिता तयार होण्यासाठी तिचा पाया कसा मजबूत हवा, याचा ऊहापोह या पुस्तिकेत 'टप्याटप्याने' केला आहे.

बचत गटाची नुसती सभासद असणं आणि त्यातील अर्थव्यवहारांची जाण असणं यात पुष्कळ फरक पडतो. दरमहा वीस-पंचवीस रूपये बचत करून वीस महिलांचा गट अडीनडीला अनेकींच्या उपयोगी कसा काय पडू शकतो, याचे रहस्य गटात पैसा कसा खेळतो या पाठातून उलगडून दाखविले आहे. व्याजदराचा उलगडा, गटाचे विविध नियम, कोणते निर्णय योग्य व ते का याची जाण चर्चात्मक पद्धतीने जोपासण्यासाठी छोट्या छोट्या ५ पाठांची मांडणी केली आहे.

त्या त्या गटाची प्रमुख महिला ही या उपक्रमाच्या पाठीचा कणा आहे. प्रमुखाला नेतृत्वगुण असणे महत्त्वाचे, सचोटी अत्यंत आवश्यक, त्यामानाने शिक्षण, लिखापढीची सवय असणे-नसणे हे दुय्यम आहे, याची जाणीव व्यवहारात अनेक महिलांना होत असेल. गटप्रमुखांसाठी असलेले ७ पाठ त्यांची गटाच्या व्यवहारावरची पकड मजबूत करणारे आहेत. सोप्या उदाहरणांवरून अवघड आकडेमोडीकडे क्रमाक्रमाने गेल्यामुळे आत्मविश्वास वाढत जातो, असे निदर्शनास येईल. अनेक प्रसंगांना तोंड देताना नेमकी काय भूमिका घेतली पाहिजे, याबाबत गटप्रमुखांची वृत्तीघडण होण्यास या पाठांचा उपयोग होईल. प्रशिक्षण देणारीने गटप्रमुखांच्या विषय समजण्याच्या वेगाने हळूहळू पुढे गेले पाहिजे. नुसत्या तयार सूचना देण्याचे यात टाळले आहे. काही करून बघितले, मांडून बघितले की त्या विषयाचे मर्म पक्के लक्षात येण्यास मदत होते.

गटाचे व्यवस्थापन घडवून आणणाऱ्या कोणत्याही संस्थेच्या संघटिका म्हणजे तिसरा स्तर होय. त्यांना खूप व्यवधाने सांभाळावी लागतात. नेमकी माहिती असावी लागते. समोर आलेली कागदपत्रे अचूक आहेत का, याचा कमी वेळात अंदाज घ्यावा लागतो, म्हणून त्यांचे प्रशिक्षण यात आवर्जून योजले आहे. त्यांच्या पाठांची रचना करताना पत्रकांची मांडणी तपासता येणे, चुकांच्या संभाव्य जागा हेरता येणे, बँक व्यवहारांबाबत गटप्रमुखांना मार्गदर्शन करता येणे अशा गरजा लक्षात घेऊन मजकूर घातला आहे.

प्रशिक्षणाचे तंत्र म्हणून काही गणिते जशी विविध पातळ्यांना सोडवावयास सांगितलेली आहेत, तशा दोन स्पर्धा सुद्धा घेण्यास सुचविले आहे. त्यामुळे प्रशिक्षणातील रंजकता वाढेल व भीड चेपण्यास मदत होईल.

पुस्तिकेत शेवटी दिलेल्या प्रातिनिधिक अनुभवांवरून नव्या गटांना चुकांची पुनरावृत्ती टाळता येईल. संस्थांचे कार्यकर्ते यात अनेक प्रकारची भर घालू शकतील.

बचत गटांच्या प्रशिक्षणाबाबत अनेक ठिकाणी विविध प्रकारचे साहित्य प्रकाशित झाले आहे. या पुस्तिकेमुळे केवळ आणखी एका संख्येची भर पडावी, असा उद्देश नाही. हिचा वापर करून आपापल्या अनुभवांची देवाणघेवाण करता यावी, प्रशिक्षणाच्या नेमक्या गरजा स्पष्ट होत जाऊन त्यानुसार आणखी साहित्य तयार होत राहावे, अशी कल्पना आहे.

हा शैक्षणिक हेतू मनात असल्यामुळे नाबार्डने या पुस्तिकेसाठी महत्त्वपूर्ण आर्थिक साहाय्य दिले, त्याबद्दल त्यांचे अधिकारी श्री. डेरे व त्यांचे सर्व सहकारी यांचे आभार मानतो व प्रशिक्षकांच्या हाती ही पुस्तिका सोपवितो.

**श्री. वि. शं. / सुभाष देशपांडे**

कार्यवाह

**ज्ञान प्रबोधिनी, पुणे**

चैतन्य
ग्रामीण महिला, युवक व बाल विकास संस्था
● मुख्य कार्यालय : मु. राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे.- ४१० ५०५. ☎ (०२१३५) २३१७६
● संपर्क कार्यालय : ७८७, डेक्कन जिमखाना, हॉटेल रविराजच्या मागे, भांडारकर रोड,पुणे. - ४११ ००४.
☎ (०२०) ५६६०५८१, ५६७२५९१ फॅक्स : (०२०) ५६७०८३८
ई-मेल : chaitanya_pune@yahoo.co.in

# अभिनंदन

ज्ञान प्रबोधिनीतील अभ्यासू व प्रयोगशील वातावरणात वाढलेल्या कार्यकर्त्यांच्या कामाची झलक या प्रशिक्षण पुस्तिकेतून दिसते. स्वयंसाहाय्यता समूह चळवळ बळकट करण्यामध्ये सभासद, संघटिका आणि गटप्रमुखांची हिशोबाबद्दलची समज अतिशय महत्त्वाची ठरते. चोख हिशोब करता येणं आणि करून घेता येणं हे कौशल्य स्वयंसाहाय्यता समूह चळवळीचा कणा आहे. वेगानं वाढणाऱ्या गटांची संख्या बघता त्याची नितांत गरजही आहे.

या प्रशिक्षण पुस्तकाची निर्मिती खूप प्रेरणादायी आहे. प्रशिक्षण साहित्य बनवण्याच्या तंत्रातले सर्व टप्पे हे पुस्तक तयार करताना करण्यात आले आहेत. प्रथम प्रशिक्षणाची गरज शोधणे, पाठ तयार करणे, ते सोडवताना जिथे अडेल तिथे मार्ग काढणे, साधनं विकसित करणे, ती तपासणे, पुन्हा दुरुस्त करणे ही प्रक्रिया सातत्याने करणाऱ्या स्वयंप्रेरित प्रशिक्षकांचा गट या संपूर्ण विषयासोबत एकरूप झालेला आहे.

'चालना'मध्ये प्रशिक्षण गट विकसित होण्याच्या मूळ कल्पनेस सुरुवात झाली. ती सुवर्णा, बागेश्री व त्यांच्या सहकारी गटाने प्रत्यक्षात आणली. त्या सर्वांचे हार्दिक अभिनंदन!

नाबार्डने या कामाला प्रोत्साहन दिले आहेच. चैतन्य महिला प्रशिक्षण व संसाधन केंद्र या पद्धतीचा वापर व प्रसार करण्यात निश्चितच सहभागी होईल.

**डॉ. सुधाताई कोठारी**
अध्यक्षा,
चैतन्य महिला संसाधन व प्रशिक्षण केंद्र
'संगम', वाडा रोड,
राजगुरुनगर

राष्ट्रीय कृषि और ग्रामीण विकास बैंक
NATIONAL BANK FOR AGRICULTURE AND RURAL DEVELOPMENT

महाराष्ट्र क्षेत्रीय कार्यालय
54, वेलेस्ली रोड, पो.बा.क्र. 5. शिवाजीनगर
पुणे - 411 005

Maharashtra Regional Office
54, Wellesley Road, P.B.No.5, Shivajinagar
PUNE -4110 005

☎: 25511083, 25500100 ■ फैक्स / Fax : (020)25512250 ■ ई-मेल / E-Mail : nabpun@dataone.in

# शुभेच्छा

ग्रामीण भागातील गरीब जनतेला सुलभतेने कर्ज उपलब्ध व्हावे व त्यांची सावकाराच्या पाशातून मुक्तता व्हावी या उद्देशाने राष्ट्रीय कृषि व ग्रामीण बँकेने (नाबार्ड) १९९२ साली स्वयं साहाय्यता गट बँक जोडणी कार्यक्रम भारतात सुरु केला. गेल्या दीड दशकामध्ये या कार्यक्रमाने उत्तुंग भरारी घेतली असून सर्व जगभर सर्वात मोठा सूक्ष्म ऋण कार्यक्रम म्हणून ख्याती झाली आहे.

देशामध्ये मार्च २००७ अखेर २९ लाखांच्यावर गटांना बँकांनी ११,९७५ कोटी कर्ज वाटप केले आहे. १९९२ साली लावलेल्या रोपट्याचे वटवृक्षामध्ये रुपांतर झाले आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. या कार्यक्रमाद्वारे अंदाजे ४ कोटी कुटुंबांना व २० कोटी गरीबांना आपल्या अडीअडचणीला व कुटुंबाचे उत्पन्न वाढविण्यासाठी व्यवसायाला सहजगत्या बँक कर्जाचा लाभ मिळत आहे.

या कार्यक्रमाचे यश नाबार्डने व इतर अनेक संस्थांनी केलेल्या अभ्यासातून व संशोधनांतून सिध्द झाले आहे. ज्या गावांमध्ये बहुसंख्येने गट आहेत त्या गावातील सावकारी संपुष्टात आली आहे. जवळपास ९० टक्के गट महिलांचे आहेत. दवाखाना व मुलांचे शिक्षण यासाठी प्रामुख्याने महिला गटातून कर्ज घेतात असे दिसून आले आहे. प्राथमिक गरजा भागल्यानंतर शेती विकास, दुग्ध व्यवसाय, शेळीपालन व इतर छोटे उद्योग व्यवसाय यासाठी बँक कर्ज घेऊन गावातील महिलांनी आपल्या कुटुंबाचे उत्पन्न वाढविण्यास हातभार लावला आहे. यामुळे महिलांचे कुटुंबातील व समाजातील स्थान उंचावले आहे. स्वयं साहाय्यता गट चळवळीद्वारे ग्रामीण भागात एक प्रकारे मूक सामाजिक व आर्थिक क्रांती घडत आहे.

स्वयं साहाय्यता गट ज्या वेगाने वाढत आहेत ते पाहता संख्यात्मक वाढीबरोबर गुणवत्तेवरही भर देणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने नाबार्ड, बँका, स्वयं सेवाभावी संस्था व शासन आपापल्या परीने प्रयत्न करीत आहेत. गटांची गुणवत्ता टिकविण्यासाठी प्रशिक्षण त्याचप्रमाणे योग्य मार्गदर्शक पुस्तकांची आवश्यकता आहे.

ज्ञान प्रबोधिनी या महाराष्ट्रातील नामांकित संस्थेने गटसभासद, गटप्रमुख व संघटिका यांच्यासाठी प्रशिक्षण पुस्तिका तयार केली आहे. त्यांच्या शैक्षणिक पातळीची जाणीव ठेऊन पुस्तिकेची रचना केली आहे. ज्ञान प्रबोधिनीचे गट निर्मिती व संवर्धनाचे अनुभव व गटामध्ये पुस्तिकेतील पाठांचे प्रत्यक्ष प्रयोग यामुळे ही पुस्तिका अतिशय उपयुक्त झाली आहे. ज्ञान प्रबोधिनीमध्ये स्वयं साहाय्यता गटांचे काम करणाऱ्या सुवर्णा गोखले व बागेश्री पोंक्षे यांचे ही पुस्तिका तयार करण्यामागे प्रयत्न व चिकाटी प्रशंसनीय आहे. नाबार्डने ह्या पुस्तिकेसाठी आर्थिक मदत केली आहे. ही पुस्तिका इतर भाषांमध्येही प्रकाशित व्हावी अशी अपेक्षा आहे.

**श्री. सुरेश डेरे**
उप महाव्यवस्थापक
राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बँक
महाराष्ट्र क्षेत्रीय कार्यालय, पुणे.

# निमित्त

आम्ही गावोगावच्या आया-मावश्या-बहिणींबरोबर बचतगटाचं काम करायला लागलो.
सभासद, गटप्रमुख यांची प्रशिक्षणे घ्यायला लागलो.
त्यांच्याशी बोलताना अनेक गोष्टी त्यांनी सुचवल्या आणि मग त्याप्रमाणे आम्ही साहित्य बनवत गेलो.
**त्या म्हणाल्या,** पुस्तकावरनं सांगावा द्यायचा तर द्या, पन ते सोप्प हवं --- म्हणून आम्ही पुस्तिका सोपी केली.
निस्तं सोप्प न्हवं; त्याची लई खिटखिट पन नको----म्हणून आम्ही ती सुटसुटीत केली.
लिहाया कटाळा येतो, सवयीचं नसतं म्हणाल्या --- म्हणून X ✓ अशी उत्तरं लिहायला सांगितली.
बाया परशिक्षनात मिस्त्री लावल्यागत गुळणा धरून बसत्यात --- म्हणून प्रशिक्षण खेळीमेळीचं केलं.
परत्येकीचा इचार येगळा असतो ---- म्हणून उत्तरांवर गटात चर्चा घ्यायचं ठरलं.
परशिक्षन खेळावाणी घेतलं; लिहाया कमी केलं---- म्हणून तरी सारं उमगलं. ते हसत खेळत झालं.
ते तुम्हाला सांगावंसं वाटलं म्हणून हे पुस्तक लिहिलं. तुम्हीही हे करून पाहणार ना ?
तुमचेच,
**गंगुताई, भारती, सोपान, आशा, शैला, विवेक, सुरेखा, हिरा, हेमंत आणि साऱ्या गटांच्या सदस्या**
**(ज्ञान प्रबोधिनीच्या शिवगंगा व गुंजवणी खोरे विकास योजनेतील सहभागी सदस्य, जि. पुणे)**

# मनोगत

दर महिन्याचा कुटुंबाचा जमा-खर्च पाहताना बहुतांश महिला त्यांच्याजवळच्या उपजत अशा शहाणपणाचा वापर करताना दिसतात. तसेच गटाचा हिशोब ठेवतानाही त्या व्यवहारातील गणिताचं तंत्र वापरतात. पण कुटुंबातील व्यवहार व गटातील व्यवहार या दोन्हीतही गणिताच्या तंत्राबरोबरच सामाजिक बांधिलकीचा आशयही हवा. गटांमधून काम करताना ह्या दोन्ही गोष्टी एकाच वेळी आणि जेवढ्या आवश्यक तेवढ्या प्रमाणात गटात कशा येतील हा महत्त्वाचा प्रश्न प्रशिक्षणे घेताना आम्हाला जाणवला.

ज्ञान प्रबोधिनीतील क्षेत्र कार्यकर्त्यांचं प्रशिक्षण घेत असतानाच चालना, चैतन्य, बाएफ, सोस्वा, पॅक्स कार्यक्रमांतर्गत संस्थांसाठी विविध प्रकारची प्रशिक्षणे घेतली. त्यासाठी वेगवेगळे प्रशिक्षणाचे साहित्य तयार केले, वापरले, विविध संस्थांमधून आलेल्या प्रतिनिधींनी प्रातिनिधिक प्रश्न व व्यावहारिक अडचणी सांगितल्या. गावपातळीवरील महिलांबरोबर काम करताना, त्यांची प्रशिक्षणे घेताना कोणत्या प्रकारच्या साहित्याची गरज आहे हे आम्हाला प्रशिक्षण घेताना समजले आणि त्याच्याच संकलनातून ही प्रशिक्षण पुस्तिका तयार झाली.

हे प्रशिक्षण साहित्य मागणीनुसार व प्रशिक्षकांशी चर्चा करून केलेले असल्याने ते जास्तीत जास्त गरजेप्रमाणे बनवलेले आहे. बचतगट चळवळींमधील चांगल्या सवयींवर चर्चा होऊन नकारात्मक गोष्टी टाळण्याकडे गटाचा कल ठेवण्याकरिता प्रशिक्षणामध्ये चर्चेला महत्त्व आहे. प्रशिक्षकाने ही चर्चा चांगल्या वातावरणात घडवून आणावी. नकारात्मक गोष्टींवरील चर्चा टाळू नयेत तर त्यावर सर्वांच्यात विचारांची देवाण-घेवाण घडवून आणून गटाने निष्कर्षाप्रत यावे. प्रत्येक प्रशिक्षणानंतर चांगला समारोप होईल याची प्रशिक्षकाने काळजी घ्यावी.

सर्वात शेवटी सभासद, गटप्रमुख, संघटिका, कार्यकर्ते या बचतगट चळवळीच्या साखळीतील प्रत्येक दुव्याची गटासंबंधी जाणीव समृद्ध व्हावी आणि प्रत्येकानेच संपूर्ण गटाला त्याद्वारे योग्य दिशेला नेण्यासाठी या समृद्ध जाणिवेचा उपयोग करावा अशी अपेक्षा आहे. यासाठी आपण सर्वजण प्रयत्न करूयात.

आपल्याच,

**सुवर्णा गोखले** **बागेश्री पोंक्षे**

# अनुक्रमणिका


* प्रशिक्षकांसाठी हितगुज ८

## टप्पा १ : सभासद प्रशिक्षण ९ – २०

१ पैसे असे खेळतात..... १०–११
२ सावकारापेक्षा गटच बरा १२–१३
३ योग्य पर्याय निवडा १४–१५
४ बरोबर विधाने ओळखा १६–१७
५ चूक कोणाची ? १८–१९
* गटाचे नियम २०

## टप्पा २ : गटप्रमुख प्रशिक्षण २१–४०

१ मग काय करायचं ? २२–२३
२ थोडी गणिते करू या २४–२५
३ सांगा पाहू व्याज काय ? २६–२७
सेवाशुल्क दर तक्ता २८–२९
४ पासबुक नोंदवा ३०–३१
५ स्पर्धा १ – कॅलक्युलेटरने बेरीज करा ३२–३३
६ चूक की बरोबर लिहा ३४–३५
७ ताळेबंद बनवा ३६–३९
८ स्पर्धा २ – रक्कम मोजा ४०

## टप्पा ३ : संघटिका प्रशिक्षण ४१ – ५४

१ काय काळजी घ्याल ? ४२
२ गटावर नियंत्रण ठेवताना ४३
३ आदर्श गटाचा हिशोब ४४–४५
४ गटात पैसे खेळल्यामुळे... ४६–४७
५ जमाखर्च पत्रक बनवा ४८–५१
६ शिकवणारे अनुभव ५२–५४

## अभिप्राय ५५

# प्रशिक्षकांसाठी हितगुज

पुस्तिकेतील प्रशिक्षणे तीन स्तरांवरील आहेत. टप्पा १, २ व ३ म्हणजे सभासद प्रशिक्षणे, गटप्रमुख प्रशिक्षणे व संघटिकेसाठीची प्रशिक्षणे. सभासद व गटप्रमुखांबरोबर संघटिकेसाठीही प्रशिक्षणांची गरज असते.

## तयारी अशी करा–

प्रशिक्षकांनी प्रशिक्षण घेण्यापूर्वी स्वत: प्रशिक्षणातील उदाहरणे सोडवावीत. एकदम प्रशिक्षणाला सुरुवात करू नये. ती सोडवताना कुठल्या विधानाला कुठला अनुभव सांगायचा याचे नियोजन करावे, म्हणजे प्रशिक्षण प्रभावी होईल. हे अनुभव स्थानिक असावेत, यामुळे त्याला जिवंतपणा येईल. या प्रशिक्षण साहित्याचा उपयोग आपण सढळ हाताने करावा. प्रशिक्षणाच्या सूचना देताना त्या होकारात्मक भाषेत द्याव्यात.

उदा. प्रशिक्षणे घेताना :–

'इकडे लक्ष द्या' असे म्हणावे. 'गप्प बसा' असे म्हणू नये.

## पुस्तक असे वापरा –

बहुतेक ठिकाणी प्रशिक्षणातील धडे उजव्या पानावर दिले आहेत. त्यांची उत्तरे किंवा त्या विधानांवरील चर्चेचे मुद्दे हे डावीकडील पानावर दिलेले आहेत. या मुद्यांचा आधार प्रशिक्षकाला घेता येईल.

या साहित्याची अशी रचना केली आहे की त्याची पाने झेरॉक्स करून आपल्याला वापरता येतील. प्रौढ सदस्यांच्या शिक्षणात प्रत्येक व्यक्ती ही अनुभवांमधून शिकते. त्यानुसार मते बनवते, वागते. त्यातून तिचा दृष्टिकोन बनतो, हे गृहित धरावे. म्हणून प्रत्येकीचा दृष्टिकोन सर्वांसमोर यायला हवा. या अनुभवांच्या देवाण–घेवाणीतून प्रशिक्षणार्थी गटाला शिकता यावे, यासाठी प्रशिक्षकाने प्रत्येक व्यक्ती प्रशिक्षणांमध्ये सहभागी होईल हे पाहावे.

(पुरूष अथवा स्त्री या दोन्हींसाठी प्रशिक्षक असा एकच शब्द वापरला आहे.)

★★★★★

# टप्पा १ : सभासद प्रशिक्षण



बचतगट सभासदांना गटाची संकल्पना स्पष्ट व्हावी यासाठी सभासद प्रशिक्षणांची योजना केलेली आहे. शिक्षणाचे प्रमाण कमी असणाऱ्यांनाही सहजपणाने सोडवता येतील अशी, मोठ्या अक्षरातील, 'होय-नाही' सांगा, 'बरोबर-चूक' खूण करा अशी प्रशिक्षणे आहेत. ही प्रशिक्षणे सोपी, सुटसुटीत असली, तरीही मूलभूत पायाच्या गोष्टींवर सविस्तर चर्चा घडवून आणणारी आहेत. ही वारंवार, सातत्याने घ्यावीत. पुरेसा वेळ देऊन घ्यावीत. एक प्रशिक्षण अडीच ते तीन तास घ्यावे. एकाच दिवसात सर्व उरकू नये. कारण यातील अनेक मूल्ये ही चर्चेने सभासदांपर्यंत पोहोचणे व ती अंगीकारली जाणे यात खूप अंतर असू शकते, त्यामुळेच गट जुना झाला तरी संकल्पनात्मक प्रशिक्षणे घेत राहावी लागतात.

प्रशिक्षणांमध्ये दिलेल्या विधानांमधून वाटणारा अर्थ, बचतगटात प्रत्यक्षात घडणाऱ्या घटनांचा अर्थ व अपेक्षित अर्थ यावर प्रशिक्षण घेताना प्रशिक्षकाने चर्चा करावी. सभासदांच्या अनेक गुणांवर, चांगल्या सवयींवर, विविध गैरसमजुतींवर साधक-बाधक चर्चा होऊन सभासदांना योग्य तेच निवडण्यासाठी या चर्चेचा उपयोग व्हावा, यासाठी ही विधाने आहेत.

टप्पा १ मधील सभासद प्रशिक्षणात खालील ५ विषयांवर चर्चा क्रमशः घडवाव्यात.

**१ पैसे असे खेळतात.....**

**२ सावकारापेक्षा गटच बरा**

**३ योग्य पर्याय निवडा**

**४ बरोबर विधाने ओळखा**

**५ चूक कोणाची ?**

★★★★★

# पैसे असे खेळतात.....

एखाद्या गावात नवीन गट सुरु करायचा असला तर सावकार, बँक अशी तुलना करून गटाचे महत्त्व सांगितले जाते. तेव्हा पान क्र. ११ वरील गोष्ट सांगितल्याचा उपयोग होतो.

वर्ष झालेल्या एखाद्या गटात परतफेड नियमित होत नसेल तरी या गोष्टीचा उपयोग होतो. एखादी व्यक्ती कर्ज घेऊन व्याज देते, परतफेड करत नाही आणि म्हणते 'पैसे कुणाहीकडे गेले तरी व्याज तेवढेच मिळते' तेव्हा परतफेड लवकर झाली तर गटातल्या अनेकींच्या गरजा भागतात हे सांगायलाही याचा उपयोग होतो.

यावर चर्चा करत एक तास तरी सत्र घ्यावे. सत्राची सुरुवात करताना रस वाढावा म्हणून सोबत एक १० रुपयाची नोट द्यावी. 'ह्या नोटेतून किती खरेदी कराल?' असा प्रश्न विचारावा, त्यावर उत्तरे द्यायला सांगावीत, ती फळ्यावर लिहावीत. मग 'माझ्याकडे जादूची नोट दिसते ह्यातून मी खूप खरेदी करू शकते' असे विधान करून मग हे सांगावे. या नाट्यमयतेमुळे ऐकणाऱ्याचा उत्साह वाढतो व पुढील प्रशिक्षणातही रस वाढून सहभाग वाढतो.

★★★★★

# पैसे असे खेळतात.....

सखुबाईकडं एक १० रुपयाची नोट होती.
तिच्या घरी पाहुणे आले म्हणून तिला सरबत करायचं होतं.
ती गेली पारुकडे. **१० रुपयाची नोट देऊन** तिच्याकडनं तिनं
**४ लिंबं खरेदी केली.**
पारुचं दळण भिमाबाईच्या गिरणीत दळायला दिलं होतं.
पारुनं सखुनी दिलेली **१० रुपयाची नोट**
**भिमाला दिली आणि दळण** घेऊन आली.
भिमेचं झंपर राधाकडं शिवायला दिलं होतं.
पारुनं दळणाचे दिलेले **१० रुपये तिनं राधाला दिले आणि**
**झंपर घेतलं. राधाने ते १० रुपये चहासाठी साखर**
**आणायला** वापरले तेव्हा ते दुकानदार **सुजाताकडे** गेले.
म्हणजे बघा, **१० रुपयाची नोट एकच होती,**
पण त्यातनं सखुला-लिंबं, पारुला-दळण, भिमेचा-झंपर,
राधेसाठी-साखर अशा ४ जणींची खरेदी झाली.
आणि पुन्हा सुजाताकडं १० रुपये जमा झाले.
म्हणजे **नोट फिरत राहिल्यामुळे**
**४ जणींची मिळून ४० रुपयांची गरज भागली आणि**
**१० रुपयाची नोट हाताशी शिल्लक राहिली.**
**१० रुपयाची नोट फिरत राहिल्यामुळे पुढेही**
**अनेक जणींची गरज भागवेल.**
**यालाच म्हणायचे पैसे खेळते राहणे.**
आपापसात व्यवहार करण्याचा हाच उपयोग असतो.
**बचत गटाच्या व्यवहारामुळंही अगदी असंच होतं !**
**गरज अनेकींची भागते आणि पैसे गटातच राहतात.**

★★★★★

# सावकारापेक्षा गटच बरा

सखुबाई **सावकाराकडे** गेली. तिनं ५ % दरानं लेकीच्या लग्नासाठी ५००० रुपये घेतले. तर ती कसे फेडते ? रु. ५०००/– घेतले. व्याज रु. २५०/–कापून हातात मिळाले रु. ४७५०/– कर्ज घेतल्यापासून ८ महिन्यात सखूने कर्ज फेडले. सावकार दोन पद्धतीने व्याजाची आकारणी करतो.

१) **स्थिर व्याज दर :** कर्जाची परतफेड केली तरी सावकार मूळ मुद्दलावर व्याज घेत राहतो.
जसे टेबल १ मध्ये दरमहा रु. २५०/– प्रमाणे सखू ८ महिन्यात एकूण **व्याज रु. २०००** देते. ते सुद्धा रु. ४७५० वर (कारण पहिल्याच महिन्यात व्याज कापून तिच्या हातात पैसे मिळतात.)

२) **उतरते व्याज :** परतफेड जसजशी होईल तसतसे उरलेल्या मुद्दलावर व्याज आकारले जाते. तसे केले तर रु. २००० ऐवजी **व्याज रु. १२१४/–** भरले जाते. ते टेबल २ मध्ये दाखवले आहे. तरी ते जास्तच आहे.

टेबल १– **स्थिर व्याज दर**

| महिना | घेतलेले साहाय्य | साहाय्य परतफेड | येणे बाकी | व्याज | एकूण जमा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| मार्च | ५००० | | ५००० | २५० | २५० |
| एप्रिल | | ७५० | ४२५० | २५० | १००० |
| मे | | ७५० | ३५०० | २५० | १००० |
| जून | | ७५० | २७५० | २५० | १००० |
| जुलै | | ७५० | २००० | २५० | १००० |
| ऑगस्ट | | ७५० | १२५० | २५० | १००० |
| सप्टेंबर | | ७५० | ५०० | २५० | १००० |
| ऑक्टो. | | ५०० | ० | २५० | ७५० |
| **एकूण** | **५०००** | **५०००** | | **२०००** | **७०००** |

टेबल २– **उतरते व्याज**

| महिना | घेतलेले साहाय्य | साहाय्य परतफेड | येणे बाकी | व्याज | एकूण जमा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| मार्च | ५००० | | ५००० | २५० | २५० |
| एप्रिल | | ७५० | ४२५० | २५० | १००० |
| मे | | ७५० | ३५०० | २१३ | ९६३ |
| जून | | ७५० | २७५० | १७५ | ९२५ |
| जुलै | | ७५० | २००० | १३८ | ८८८ |
| ऑगस्ट | | ७५० | १२५० | १०० | ८५० |
| सप्टेंबर | | ७५० | ५०० | ६३ | ८१३ |
| ऑक्टो. | | ५०० | ० | २५ | ५२५ |
| **एकूण** | **५०००** | **५०००** | | **१२१४** | **६२१४** |

## गटाचा हिशोब

गट साधारण २ % दरमहा दराने कर्ज देतो. गट म्हणजे सावकार नसल्याने किंवा गटात कोणी एकजण सावकार नसल्याने व गटाचे पैसे सर्वांचे मिळून एकत्र असल्याने कर्जावर व्याज न म्हणता आर्थिक सेवा शुल्क असा शब्द वापरला जातो, हे समजावून सांगावे. सखूच्या ५००० रक्कमेला २% दरमहा दराने काय शुल्क पडते ते टेबल ३ मध्ये दाखवले आहे. तिला ८ महिन्यात फक्त ३८५ रु. भरावे लागतात व ते सुद्धा पूर्ण ५००० रक्कम हातात पडल्यावर ! जर ह्या गटात १५ जणी आहेत असं धरलं तर गटात नफा वाटून घेताना तिनं या भरलेल्या रु. ३८५ शुल्कातले तिला २५.६० रुपये परत मिळतात. (रु. ३८५ /१५ जणी = २५.६० रुपये) कारण गटातील पंधरापैकी ती एक मालकीण आहे. म्हणजे तिचे **३५९ रुपयेच व्याज किंवा शुल्क** गेले.

टेबल ३– बचत गटाचे आर्थिक सेवाशुल्क

| महिना | घेतलेले साहाय्य | साहाय्य परतफेड | येणे बाकी | आर्थिक सेवा शुल्क | एकूण जमा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| मार्च | ५००० | | ५००० | | |
| एप्रिल | | ७५० | ४२५० | १०० | ८५० |
| मे | | ७५० | ३५०० | ८५ | ८३५ |
| जून | | ७५० | २७५० | ७० | ८२० |
| जुलै | | ७५० | २००० | ५५ | ८०५ |
| ऑगस्ट | | ७५० | १२५० | ४० | ७९० |
| सप्टेंबर | | ७५० | ५०० | २५ | ७७५ |
| ऑक्टो. | | ५०० | ० | १० | ५१० |
| **एकूण** | **५०००** | **५०००** | | **३८५** | **५३८५** |

# सावकारापेक्षा गटच बरा

सखुबाईने लेकीच्या लग्नासाठी ५००० रुपये कर्ज घेतले. तर ती कसे फेडेल ? बचत गटाच्या पासबुक प्रमाणे खालील टेबलमध्ये परतफेड व्याज लिहा. टेबल १ मध्ये सावकाराचा स्थिर व्याज दर ५% दरमहा गृहित धरावा. म्हणजे दरमहा कर्ज फिटेपर्यंत सखुबाई व्याज २५० रु.. देईल व हप्ता रु. ७५०. ती दरमहा १००० देणार हे गृहित धरावे.

टेबल १
**सावकाराचे पुस्तक**
**स्थिर व्याजदर**
५%

| महिना | घेतलेले साहाय्य | साहाय्य परतफेड | येणे बाकी | व्याज | एकूण जमा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| मार्च | ५००० | | ५००० | २५० | २५०* |
| एप्रिल | | ७५० | ४२५० | २५० | १००० |
| मे | | ७५० | ३५०० | २५० | १००० |
| जून | | | | | |
| जुलै | | | | | |
| ऑगस्ट | | | | | |
| सप्टेंबर | | | | | |
| ऑक्टो | | | | | |
| **एकूण** | | | | | |

* सावकार व्याज रु. २५०/–कापून हातात रु. ४७५०/– देईल.

उतरते व्याज म्हणजे गटासारखे, फेड झाली की कमी होणाऱ्या मुद्दलावर व्याज कमी कमी होणार. इथेही फेड दरमहा रु. ७५० धरावी.

टेबल २
**सावकाराचे पुस्तक**
**उतरते व्याजदर**
५%

| महिना | घेतलेले साहाय्य | साहाय्य परतफेड | येणे बाकी | व्याज | एकूण जमा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| मार्च | ५००० | | ५००० | २५० | २५० |
| एप्रिल | | ७५० | ४२५० | २५० | १००० |
| मे | | ७५० | ३५०० | २१३ | ९६३ |
| जून | | | | | |
| जुलै | | | | | |
| ऑगस्ट | | | | | |
| सप्टेंबर | | | | | |
| ऑक्टो | | | | | |
| **एकूण** | | | | | |

गटामध्ये फेड रु. ७५०/– दरमहा होईल व सेवा शुल्क येणे बाकीवर २% दराने काढावे.

टेबल ३
**गटाचा हिशोब**
**सेवाशुल्क दर**
२%

| महिना | घेतलेले साहाय्य | साहाय्य परतफेड | येणे बाकी | सेवाशुल्क | एकूण जमा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| मार्च | ५००० | | ५००० | | |
| एप्रिल | | ७५० | ४२५० | १०० | ८५० |
| मे | | ७५० | ३५०० | ८५ | ८३५ |
| जून | | | | | |
| जुलै | | | | | |
| ऑगस्ट | | | | | |
| सप्टेंबर | | | | | |
| ऑक्टो | | | | | |
| **एकूण** | | | | | |

**प्रशिक्षकासाठी टिपण – सभासद प्रशिक्षण ३**

# योग्य पर्याय निवडा

गट सुरू होताना गुण्या–गोविंदाने सुरू होतो, पण जसजसा काळ लोटतो तसतशा गटात कुरुबुरी सुरू होतात. त्याचा अभ्यास केल्यावर समजलं की, अपवादानं चालेल असं गटानं जेव्हा म्हटलेलं असतं तेच नियम व्हायला लागतात. त्यामुळे सोबतच्या प्रशिक्षणात कुठलं ठराविक उत्तर बरोबर किवा चूक असं काही नाही, पण ह्यावर गटात मोकळेपणानं चर्चा व्हायला हवी.

१) एखाद्या ठिकाणी महिला 'गटप्रमुख' आहे या गोष्टीचे भांडवल करून ती सवलत घेतली आहे असेही घडू शकते. तर कधी जबाबदार व्यक्तीही गरजेच्या कारणासाठी सवलत मागते. याचा विचार करून सर्वांनी निर्णय घ्यावा. प्रमुखाकडून गटाच्या अपेक्षा काय, यावर चर्चा व्हावी. चर्चेचे मुद्दे – गट प्रमुख कोणास करावे? तिचे शिक्षण, वय, अनुभव, सामाजिक स्थान, गटासाठी वेळ देण्याची तयारी, मोबदल्याची अपेक्षा यावर चर्चा व्हावी. सभासदांचे व प्रमुखाचे अधिकार काय? याचीही माहिती या निमित्ताने जाता जाता द्यावी.

२) गटातल्या महिलांनी समजून घ्यावे असे नेहमी म्हटले जाते. कुठल्या अडचणी खरंच अडचणी असतात, कधी परवानगी काढून हजर नसलं तरी चालेल? तेव्हा पैसे पाठवून द्यायचे का? यावर चर्चा व्हावी. या निमित्ताने सभासदाच्या जबाबदाऱ्या सांगाव्यात व गटात हजर असली तरी किंवा नसली तरी प्रत्येक **सभासद ही सर्व निर्णयांना जबाबदार असते**, हे उदाहरणाने सभासदांना सांगावे.

३) गट सर्व सभासदांचा असतो हे सर्वांना समजून सांगावे. अर्थसाहाय्य कर्ज कधीही न घेणाऱ्या व्यक्तीला व्याजाचा सर्वाधिक फायदा होणार म्हणून व्याजदर जास्त असावा असे ती व्यक्ती म्हणत नाही ना? यावर चर्चा व्हावी. गटात निर्णय एक – दोघींचा असावा का गटाचा? थोडक्यात काय, तर जास्तीत जास्त सभासदांचा फायदा व्हावा. यावर चर्चा व्हावी व चर्चेनंतर **जास्ती जणींना जे वाटते तो निर्णय असे ठासून सांगावे.** बोलणारीची जात, तिचं गावातलं वजन हे सारं गटाबाहेर. **गटात सर्वजणी सारख्या!** हे पुन्हा पुन्हा सांगावे.
उदा: गटात येणाऱ्या धनगराच्या बाईला कर्जासाठी २ जामीन लागतात तसेच पाटलाच्या बायकोलाही लागतात कारण 'गटात' त्या दोघी सारख्या.

४) गट झाल्यावर थोड्या शिल्लक पैशाचेही काय करायचे याची गटाला कल्पना हवी. नाहीतर हिशोब करताना हे प्रत्येक महिन्याचे थोडे थोडे पैसे करत खूप होतात आणि वार्षिक हिशोबात ते सापडत नाहीत. या विधानाच्या उत्तराच्या पर्यायांमधील तिसऱ्या पर्यायामध्ये लिहिल्याप्रमाणे हे पैसे इतरांच्या नावावर मात्र चुकूनही लिहिले जाऊ नयेत, याची सभासदांनी खात्री करावी. शिलकीचा निर्णय न झाल्याने कर्ज म्हणूनही घेऊ नये.

५) गावात गट सुरू असतात, पण त्याकडं काहीजणी मुद्दाम दुर्लक्ष करतात. त्यांच्यावर वेळ आली की गरजेपोटी गटाकडे येतात, त्यामुळे कुठली गरज महत्त्वाची? आजारपणाची, लग्नाची की व्यवसायाची? यावरही इथे चर्चा घ्यावी व त्यासोबत कोणाची गरज महत्त्वाची? गटाची? गटातल्या सभासदांची? की श्यामची? गावाचं गटाशी नातं काय? याचीही चर्चा व्हावी. गटाबाहेर पैसे देऊ नयेत. गट फक्त पैशापुरताच नाही, हे इथं ठासून पुन्हा पुन्हा सांगावे.

★★★★★

# योग्य पर्याय निवडा

## योग्य पर्यायावर (✓) अशी खूण करा

१) खरं म्हणजे गटाचा नियम की गटात आलं नाही तर ५ रु. दंड भरायचा. भीमा गटप्रमुख होती. तीच सारं गटाचं काम बघायची, एकदा ती बैठकीला आली नाही तर, तिच्याकडून दंड घ्यायचा का? तुम्हाला काय वाटतं?

१) काम केल्याचे पैसे भीमा घेत नाही म्हणून तिने दंड भरू नये.

२) गटात सर्वांना नियम सारखे. म्हणून तिने दंड भरावा.

३) ती का आली नाही, ते विचारावे. त्यावर निर्णय ठरवावा.

४) तिला गटप्रमुख करू नये.

२) राधाबाईची गटबैठक चुकली असं कधी झालं नाही. पण एकदा तिची लेक घरी बाळंत झाली म्हणून ती गटात आली नाही. तर भामा म्हणते, तिने दंड भरला पाहिजे. तुम्हाला काय वाटते?

१) तिने दंड भरावा, कारण गटाचा तसा नियम आहे.

२) तिने दंड भरू नये, कारण घरी महत्त्वाची अडचण होती.

३) तिने पैसे पाठवून द्यावेत, पण दंड भरू नये.

४) तिच्याच घरी गट घ्यावा.

३) गटातल्या दोघींची आर्थिक परिस्थिती चांगली होती. त्यांना अर्थसाहाय्य लागायचे नाही. त्यांनी गटाचा अंतर्गत वाटपाचा व्याजदर ४% ठेवावा, असे म्हंटले. काय करावे?

१) व्याज दर ४% ठेवावा.

२) गटाने व्याजदर सर्व संमतीने ठरवावा.

३) कोण्या एका– दोघींच्या फायद्यासाठी गट नाही, हे दोघींना पटवून सांगावे.

४) सर्वांना परतफेड करता येणे शक्य होईल असा दर ठेवावा.

४) सावित्रीबाई गटप्रमुख आहेत. दरवेळी गटात शिल्लक राहिलेली रक्कम त्या त्यांच्याजवळच ठेवतात. त्यांनी काय करावे?

१) रक्कम शिल्लक राहिल्यास बँकेत भरावी.

२) स्वत:कडे ठेवून पुढील महिन्यात सर्वांसमोर जमा करावी.

३) ती परस्पर कोणाच्यातरी नावावर लिहावी.

४) स्वत:च्या नावावर कर्ज म्हणून घ्यावी.

५) गावातल्या श्यामच्या पोरीचं लग्न होतं. श्यामला आज पैसे हवे होते. गट बसायची वेळ होती. श्यामच्या घरातल्या कुणाचंही खातं गटात नव्हतं तरी तो गटात आला. ५०००/– रुपयांचं कर्ज द्या, म्हणाला.

१) श्यामला कर्ज द्यायचं.

२) श्यामला कर्ज द्यायचं नाही.

३) श्यामला जास्त व्याजानं कर्ज द्यायचं.

४) श्यामला गटाचं सभासद करून कर्ज द्यायचं.

★★★★★

प्रशिक्षकासाठी टिपण – सभासद प्रशिक्षण ४

# बरोबर विधाने ओळखा

१) बचत गट म्हणजे पैशाच्या उलाढाली. हे विधान **चूक** आहे कारण फक्त पैशाच्याच उलाढाली म्हणजे बचत गट नाहीत.

२) गट प्रमुखांनी बचत गटाची सारी कामे करायची. हे विधान **चूक** आहे कारण ही जबाबदारी फक्त गट प्रमुखांचीच नाही.

३) कर्ज मिळावे म्हणून गटाचे सभासद व्हावे. हे विधान **चूक** आहे कारण सभासद झाले की कर्ज मिळते. महत्त्व सभासद होण्यास आहे. कर्ज महत्त्वाचं झालं तर कर्ज मिळेपर्यंतच गट चालेल.

४) ✓ ही निरंतर शिक्षणाची संधी आहे.

५) X वाटप प्रमुखांनी करावे एवढे बरोबर, पण ठरवावे मात्र सर्वांनी.

६) X प्रमुखांना कुठल्याही नियमात सवलत नाही. गटप्रमुख म्हणून सवलती घेणारीला प्रमुख करू नये.

७) X पैसे गोळा होणे हा गटाचा एक भाग आहे. महिला गोळा झाल्या पाहिजेत, तर तो गट सर्वांचा.

८) ✓ एकत्र येण्यानेच खूप कामे होतात.

९) ✓ त्यासाठी सर्वांनी पूर्णवेळ हजर राहणे गरजेचे आहे.

१०) X नाही, गट म्हणजे गावकीचा फंड नाही, गटाने दरवर्षी हवेतर व्याज वाटून घ्यावे.

११) X महिलांना गट ही शिक्षणाची संधी आहे. चुका करून दुरुस्त करायचीसुध्दा संधी आहे. लक्षात ठेवायला हवे की पुरुषांची अगदीच गरज पडली तर मदत घ्यावी, पण महिलांना येत नाही म्हणून नव्हे!

१२) X गटाचे हिशोब सोपे असतात. गटात जाऊन पैशाचे व्यवहार कळायला लागतात.

१३) X कमीत कमी ५ व जास्तीत जास्त २० महिलांचा/पुरुषांचा किंवा मिश्र गट होतो. २० पेक्षा जास्त मोठा गट झाल्यास त्याची नोंदणी करणे आवश्यक असते.

१४) ✓ प्रत्येक जण गटाची मालकीण आहे. गटात होणाऱ्या सर्व गोष्टींना ती जबाबदार, त्यामुळे उपस्थिती महत्त्वाची.

१५) X गट महिलांच्या स्वयंपूर्णतेसाठी करायचे. त्याला सरकारच्या योजनांचा लाभही मिळतो. जो गट योजनेसाठी होतो, तो योजनेपुरताच टिकतो.

१६) X नाही. अडाणी महिलांना अडाणी ठेवण्यातच सावकाराचा कावा आहे. गट त्यांना शहाणे करण्यासाठी दार उघडेल.

१७) ✓ नातेवाईकांशिवाय एकत्र येण्याची एरवी संधी मिळत नाही.

१८) ✓ अर्थात संधी घेतली तर !

१९) ✓ बायजाबाई शिकलेल्या नसल्या तर गटातील बाकीच्या खाते प्रमुख शिकलेल्या असाव्यात. बायजाबाईने लिहिण्यापेक्षा इतर गोष्टींवर लक्ष ठेवणे, पैसे मोजणे अशी कामे करावीत.

२०) X फक्त प्रमुखांपैकी एकीने अथवा जिला कर्ज हवे तिने जाऊनही बॅंकेचे काम होते. गटाची योग्य ती कागदपत्रे सोबत हवीत.

★★★★★

# बरोबर विधाने ओळखा

खाली दिलेली विधाने पूर्ण वाचावीत व ते विधान चूक वाटल्यास (X) अशी खूण करावी, बरोबर वाटल्यास (✓) अशी खूण करावी.

१) बचत गट म्हणजे फक्त पैशाच्या उलाढाली. ☐

२) गट प्रमुखांनी बचत गटाची सारी कामे करायची. ☐

३) कर्ज मिळावे म्हणून गटाचे सभासद व्हावे. ☐

४) गटामुळे आत्मविश्वास वाढतो. पैशाचे व्यवहार कळतात. ☐

५) कर्ज वाटपाचे काम फक्त प्रमुखांनीच करावे. ☐

६) गट प्रमुखांनी गटात सवडीने पैसे आणून दिले तरी बिघडत नाही. ☐

७) गट प्रमुखांनी घरोघरी जाऊन गटाचे पैसे गोळा केले तरी चालतील, कारण पैसे गोळा होणं महत्त्वाचं. ☐

८) बचत गटामुळे महिलांना एकत्र येण्याची संधी मिळते. ☐

९) गट सगळ्यांच्याच मताने चालवायचा. ☐

१०) गट दरवर्षी फोडायचा असतो. ☐

११) गटांचे काम बरोबर चालत आहे असे पुरुषांनी बघायला पाहिजे. ☐

१२) पैशाचे व्यवहार करता येणाऱ्यांनीच गट करावेत किंवा गटात जावे. ☐

१३) १५ जणींचा किंवा २५ जणींचासुद्धा गट होऊ शकतो. ☐

१४) प्रत्येक सभासद महिलेने दर महिन्याला गटात आलेच पाहिजे. ☐

१५) सरकारी योजनांसाठी गट करायचे असतात. ☐

१६) अडाणी महिलांसाठी गट काय आणि सावकार काय, दोन्ही सारखेच. ☐

१७) गटामुळे चारचौघात वावरायची, बोलायची सवय होते. ☐

१८) फक्त महिलांनाही बचत गट उत्तम प्रकारे चालवता येतो. गटामुळे महिलांना बँकेचे कर्ज मिळते. ☐

१९) बायजाबाईंनी पुढाकार घेऊन गट सुरू केला. पण ती अंगठा बहाद्दर. तरी तिला गटाचं प्रमुख करावे का? ☐

२०) दर महिन्यात सर्व सभासदांना पैसे ठेवायला बँकेत जावे लागते. ☐

★★★★★

**प्रशिक्षकासाठी टिपण – सभासद प्रशिक्षण ५**

# चूक कोणाची ?

प्रत्येक विधानावर **चूक काय झाली** अशी चर्चा करावी व मग याला जबाबदार कोण? अशी चर्चा करावी. यानिमित्ताने सभासद, गटप्रमुख यांच्या जबाबदाऱ्या सांगाव्यात व गटाच्या सभासदाच्या, गटप्रमुखाच्या आदर्श वागण्यांबद्दल आपापल्या भागातील अनुभव सांगत सत्र घ्यावे.

**सर्वप्रथम चूक काय झाली हे ठरवावे.**

१) चूक – बैठकीतच पैशाचे व्यवहार व्हायला हवे, तसे झाले नाही.

ही चूक पैसे देणाऱ्या सीताची व घेणाऱ्या शैलाची अशी **दोघींची** आहे.

**चर्चा :–** गटाचा नियम काय? हिशोबात पारदर्शकता हवी. व्यवहार सर्वांसमोर व्हावेत. याला कधी अपवाद चालेल? यावरही चर्चा व्हावी. अनुभव सांगताना अशा चुका घडल्यामुळे गटाचा कसा तोटा होतो हे सांगून सभासदाची जबाबदारी व गटप्रमुखाची जबाबदारी सांगावी.

२) चूक – कोऱ्या अर्जावर सही केली.

ही चूक सही देणाऱ्या रेखाची व घेणाऱ्या जनाची अशी **दोघींची** आहे.

**चर्चा :–** बँक कागदपत्रावर सर्वांच्या सह्या कशासाठी आवश्यक आहेत? हे सांगावे. सही करताना कशासाठी सही करत आहोत? कशावर सही करतो ? याविषयी जागरुकता हवी, अशी चर्चा व्हावी. सही करणं म्हणजे वर लिहिल्या जाणाऱ्या सर्व मजकुराची हमी घेणं आहे. एकदा सही केल्यावर नंतर मला काय माहीत? असं म्हणता येत नाही, याची कल्पना द्यावी.

३) चूक – नोंद करणे चुकले. / राहिली.

ही चूक पूर्ण गटाची आहे.

**चर्चा :–** सुजाताने लिहून घ्यायला हवे, रेणुकाने लिहायला हवे. चूक दोघींची आहे. हा व्यवहार गटासमोरच व्हायला हवा होता. लिहिण्याचे काम जरी रेणुकाचे असले तरी पैशाची जबाबदारी सर्व गटाचीच हे जास्त बरोबर आहे. चुकून असे झाले तर पुढच्या बैठकीत अहवाल वाचताना हे दुरुस्त व्हायला हवे. प्रशिक्षकाने चर्चेअंती चुकांना संपूर्ण गटच जबाबदार आहे हे वारंवार सांगावे.

४) चूक – स्वतःच्या पैशातून सुटे–बंदे एकदाच करायला हवे होते तसे केले नाही.

ही सरुची चूक झाली यात शंकाच नाही.

**चर्चा :–** गटात पैसे कुणीही गोळा केले तरी त्यावर लक्ष सर्वांचे हवे. गटाचे पैसे हे सरुचे नाहीत, गटाचे आहेत म्हणून जी पैसे घेते तिची जबाबदारी जमलेली रक्कम जमाखर्चपत्रकाशी जुळेपर्यंत ! आधी जमाखर्चपत्रकावर पैसे लिहावेत व मग पैसे घ्यावेत, ही पैसे घेण्याची पध्दत सर्वांना चर्चेच्या वेळी सांगावी.

५) चूक – कर्जफेड कर्जपुस्तकात दिसली नाही.

ही चूक सुशीलाची आहे.

**चर्चा :–** बँकेचे कर्ज घेतले की त्याचे खाते वेगळे असते. त्यातच कर्ज हप्ता भरायला हवा. पहिला हप्ता भरताना चौकशी करून भरायला हवा होता. या निमित्ताने कर्ज फेड हप्ता वेगळ्या खात्यात भरायचा असतो व माहित नसणाऱ्या गोष्टी विचारायला लाजायचे नाही, यावर बोलावे.

६) चूक –भीमाला पैसे कमी मिळाले.

ही चूक भीमाची.

**चर्चा :–** भीमाने पैसे मोजून घ्यायला हवे होते. तसेच राधानं पैसे मोजूनच द्यायला हवे होते. गटात झालेला व्यवहार प्रमाण मानावा – पैसे मोजून देणं व घेणं हा व्यवहार आहे. हा कुणावरच्या विश्वासाचा प्रश्न नसतो. हे पुन्हा पुन्हा सांगावे. अशा चुका नंतर दुरुस्त करता येत नाहीत. पण अशा चुका गटाचं 'मत' गावात बनवत असतात. म्हणून चुका होऊच नयेत, अशी काळजी घेण्याविषयी सांगावे.

★★★★★

# चूक कोणाची ?

खाली गटांमध्ये घडणाऱ्या काही घटना दिल्या आहेत त्या वाचाव्यात. असं आपल्या गटात घडतं का? आठवा. यात काही चुकलं का ? यावर विचार करा जर चुकलं, तर कोण चुकलं त्यावर (✓) खूण करा.

१) रामवाडीतल्या दुर्गामाता बचतगटाची बैठक रात्री९ वाजता असायची, गट प्रमुख असणारी शैला गट घ्यायची. गटात असणारी सीता गटाचे पैसे नेहमीच शैलाकडे सकाळी नेऊन द्यायची. काही चुकलं का ? कोण बरं चुकलं ?

चूक : सीता/ शैला/ दोघी

२) गटप्रमुख जनाबाई म्हणाली म्हणून बँकेच्या कोऱ्या अर्जावर रेखाने सही केली.

चूक : बँक मॅनेजरची / जना/रेखा /दोघींची/ संस्था कार्यकर्तीची

३) सुजाताने ऑगस्टमध्ये गटातून कर्ज घेतले, तेव्हा हिशोब रेणुका लिहीत होती. सुजाताच्या पासबुकावर कर्ज लिहावयाचे राहून गेले.

चूक : सुजाता/ रेणुका/ दोघींची/ पूर्ण गटाची / जामिनदारांची

४) गटात सगळ्यांचे पैसे सरुताई गोळा करत होती, गरज पडल्यास सुटे अथवा बंदे स्वत:च्या पैशातून करत होती. गटाच्या हिशेबात ५० रुपये कमी आले.

चूक : सरुताई/ सगळ्यांची/ खजिनदाराची

५) बँक कर्ज परतफेडीचा हप्ता सुशीलाने गटाच्या बचत खात्यात भरला.

चूक : सुशीलाची/ सचिवाची/ गटप्रमुखांची/ बँकेची

६) भीमाबाईला गटातून ३००० रुपयांचं कर्ज लागत होतं, तिला ते मिळालं. ती कर्ज घेऊन घरी गेली. दुसऱ्या दिवशी ती सकाळीच गटप्रमुख असलेल्या राधाकडं गेली आणि म्हणाली, ''त्या रकमेत १०० रु. कमी आहेत.''

चूक : भीमा/ राधा/ गटाची

★★★★★

# गटाचे नियम

बचत गटाचे नियम अनुभवानं बदलतात. गट हे सभासदांचेच असायला हवेत. एखादा बचत गट सुरू होतो तेव्हा नियम ठरतो, गटात आलं नाही तर दंड रु. २/-. गट चालू असतो. मग लक्षात येतं नुसती बचत भरणारी आली नाही तर बिघडत नाही, पण परतफेड करणारी आली नाही तर बिघडते. मग पुढचा नियम ठरतो. परतफेड झाली नाही तर रु. १० दंड, म्हणजे ती व्यक्ती आली पाहिजे. मग हा नियम लावून धरताना काही काळ लोटतो.


एखादीच्या नावावर रु. ५०० कर्ज असतं तर एखादीनं रु. १०,००० कर्ज उचललेलं असतं. मग दोघी एका महिन्यात गैरहजर राहिल्या तर गटाला सारखाच फरक पडतो का? नाही ! असं अनुभव सांगतो. ५०० रु. कर्ज बाकी असणारी सभासद आली नाही तर फारसं बिघडत नाही, पण १०,००० रुपये बाकी असणारी कर्जदार आली नाही तर बिघडतं ! असं गटाला वाटायला लागतं..... असं वाटणं चूक आहे का ? नाही.
मग नियम ठरला परतफेड न झाल्यास व्याजाइतका दंड म्हणजे जिचं व्याज जास्त तिची हजेरी महत्त्वाची.

मग हे असे नियम बदलणं स्वाभाविक आहे, असं आपण म्हणायला पाहिजे. त्याहीपेक्षा पुढे जाऊन असे नियम बदलतात हे गटाच्या जिवंतपणाचं लक्षण आहे, असंच आपण मानायला हवं !

गट हे 'सभासदांचेच' असायला हवेत, संस्थेचे किंवा बँकेचे गट म्हणण्याची पध्दत बनली, तर त्या गटात नियम बदलले जात नाहीत, हे आपण लक्षात घ्यायला हवे.

★★★★★

# टप्पा २ : गटप्रमुख प्रशिक्षण



गटाची यशस्विता ही गटप्रमुखाच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असते. सर्वांना बरोबर घेऊन गटप्रमुखांनी गटाचे व्यवस्थापन करायचे असते म्हणून :- सोयीचे ते योग्य मानण्याची मानसिकता, पूर्वग्रहदूषित दृष्टिकोन, पदाचा योग्य वापर, तारतम्य, हिशोबातील अचूकता, विवेक, दबाव, पूर्वानुभव, पुढाकार अशा अनेक बऱ्या वाईट गोष्टींवर गटप्रमुखांची योग्य भूमिका तयार करण्याचे काम ही प्रशिक्षणे करतात.

म्हणून वैयक्तिक व्यावहारिक कौशल्यांवर भर दिला आहे.
या प्रशिक्षणामध्ये सामाजिक घटकांचा समावेश केलेला नाही.

थोडक्यात

**गट प्रमुखाची कार्यक्षमता वाढावी यासाठी ही प्रशिक्षणे योजली आहेत.**

या प्रशिक्षणांची वारंवारिता दोन महिन्यातून एक वेळा अशी असावी. कमीतकमी तीन तास, एका वेळेला एक धडा, अशा पद्धतीने प्रशिक्षण घ्यावे. दोन सत्रांमध्ये प्रशिक्षण विभागावे. दोन सत्रांमध्ये मोकळीक असावी. प्रशिक्षणाची सुरुवात खेळाने करावी. त्यामुळे वातावरण मोकळे होते. गटप्रमुखांचा सहभाग वाढतो. एकाच दिवसात सर्व उरकू नये. कारण यातील अनेक मूल्ये ही चर्चेने सभासदांपर्यंत पोहोचणे व ती प्रत्यक्ष अंगीकारली जाणे यात खूप अंतर असू शकते. त्यामुळेच गट जुना झाला तरी संकल्पनात्मक प्रशिक्षणे घेत राहावी लागतात.

टप्पा २ च्या प्रशिक्षणात गटप्रमुखांसाठी सभासदांपेक्षा जास्त जबाबदारीची परिस्थिती लक्षात घेतली आहे.

१ मग काय करायचं ?
२ थोडी गणिते करू या
३ सांगा पाहू व्याज काय ?
  * सेवाशुल्क दर तक्ता
४ पासबुक नोंदवा
५ स्पर्धा १ – कॅलक्युलेटरने बेरीज करा.
६ चूक की बरोबर लिहा.
७ ताळेबंद बनवा.
८ स्पर्धा २ – रक्कम मोजा.

## प्रशिक्षकासाठी टिपण – गटप्रमुख प्रशिक्षण १

गटप्रमुखांचे हे पहिले प्रशिक्षण आहे. त्यामुळे ह्या प्रशिक्षणात सभासदांपेक्षा गटप्रमुख कुठे आणि कसे वेगळे आहेत, त्यांच्या वेगळ्या काय जबाबदाऱ्या आहेत हे वारंवार सांगावे.

# मग काय करायचं ?

१) गट एकाच गावातल्या महिलांचा असावा म्हणून शिंदेवाडीच्या सरपंचाला ससेवाडीच्या गटात घेऊ नये. ती सरपंच असल्यानेही जास्त अधिकार गाजवू शकते. कुठल्याही शासकीय योजनांना हा गट जोडायचा नसला, तर शिंदेवाडीच्या सरपंचाला व्यक्ती म्हणून गटात घेण्यात काहीही व्यावहारिक अडचणी नाहीत.

२) गटप्रमुख नेहमी कर्ज घेते हे चुकीचे. गट फक्त गटप्रमुखांच्याच फायद्यासाठी नसतो. खरं तर गटप्रमुखाने सर्वांची नड भागल्यावर कर्ज घ्यावे. असे जी करते त्या गटप्रमुखाच्या पाठीशी सारा गट उभा राहतो असे अनुभव सांगतो. पण सारखे कर्ज घेणाऱ्या गट प्रमुखाबद्दल त्याच गटातल्या सभासद फारसे चांगले बोलत नाहीत. जरी परतफेड होत असली, तरी गट प्रमुखाने असे वागणे कटाक्षाने टाळावे.

३) कविताशिवाय गटात कुणी साक्षर /जबाबदारी घेणारी असली तर कविताला तूर्त प्रमुख करू नये. कारण हे तिचं पहिलंच बाळंतपण. त्यामुळे त्यात तिचं साधारणपणे वर्ष जाणार. सासर–माहेर होणार. पुढं बाळ लहान म्हणून वर्षभर जमेल असं नाही. त्यात ती नवी सून ! तिचा जाणत्या, वयाने मोठ्या बायकांवर दबाव कसा पडणार ? एक वेळ प्रमुखाला लिहिता आलं नाही तरी चालेल. ते कोणाकडून तरी करून घेता येईल. पण गटावर नियंत्रण मात्र ठेवता यायलाच हवं. कविताला एखाद दोन वर्षानंतर ही संधी जरूर द्यावी.

४) पैसे वाटताना कुठल्या गोष्टी विचारात घ्याव्यात यावर चर्चा व्हावी. जसे – कर्जाचे कारण उत्पादक असेल तर प्राधान्य द्यावे. कर्जाची तातडी किती? म्हणजे जसे – कदाचित पोरीचे कपडे पुढच्या महिन्यात चालतील पण बी–बियाणे तेव्हाच घ्यायला हवे. मागणी करणारीच्या नावावर आधी कर्ज आहे का ? असा विचार करायला प्रमुखाला शिकवावे.

५ ते ८) या विधानांना ठराविक एक उत्तर नाही. ह्यात गटप्रमुखांनी काय उत्तरे लिहिली आहेत यावर चर्चा करावी. उत्तरांची वर्गवारी करावी. काय करावे ? काय करू नये ? असे केल्यास काय काय घडते ? असे प्रश्न प्रसंगांवर विचारावेत.

उदा :– विधान ७ मध्ये पाटलाकडे गट घ्यावा का ? उत्तर 'हो' असेल, तर का ? 'नाही ' असेल तरी का ? असे विचारावे. गट घेतला तर काय होईल ? घेतला नाही तर काय होईल ? यावर चर्चा घ्यावी. गट घेतला नाही तर तिचे पाटीलपण नडेल का ? यावर गटात चर्चा घ्यावी व गटात पाटील किंवा मजूर सर्वजणी सारख्याच हे पुन्हा एकदा सांगावे.

प्रश्नातील विधानासारखे अनुभव (चर्चेच्या वेळी) एखादीला असल्यास तसे आवर्जून सांगायला सांगावेत म्हणजे प्रशिक्षण जास्त सहभागी पद्धतीने होईल.

★★★★★

# मग काय करायचं ?

१) ससेवाडी डोंगर कपारीतील गाव. तिथल्या महिलांमध्ये शेजारच्या शिंदेवाडी गावच्या सरपंच बाईची नेहमी ऊठबस असे. ती म्हणाली, तुमच्या गटात मी पण येते. बाकी महिलांनी तिला गटात घ्यायचे का? होय /नाही

२) जिजाबाई गटप्रमुख! त्या दर महिन्याला थोडे तरी अर्थसाहाय्य घ्यायच्या. त्या संस्थेच्या कार्यकर्त्यांच्या ओळखीच्या आहेत. त्यामुळे त्यांना कोणी बोलायचं नाही. हे बरोबर आहे का? होय/ नाही.

३) कविता गावची नवी सून. अगदी हुषार. चांगली दहावी झाली होती. तिची गट प्रमुख व्हायची तयारी होती. तिला चौथा महिना चालू होता. तिला गटप्रमुख करावे का? होय/ नाही

४) पारुबाईला बी–बियाणे खरेदीसाठी गटातून ५०० रुपये हवे होते. सविताच्या पोरीला नवीन कपडे घ्यायचे होते म्हणून ३०० रुपये हवे होते. गटात तर फक्त रु. ६०० जमले. आता वाटप कसे करायचे?

पारुबाई ______ सविता ______

५) ताराबाई गावची पुढारीण. तिने बायांना बोलावलं की साऱ्या गोळा व्हायच्या. तिचे गटात खाते होते. गटाचा महिन्याचा व्यवहार झाला की थोडे पैसे शिल्लक रहायचे. पण गटातल्या इतर सभासदांना वाटायचं की ताराबाईकडे पैसे ठेवू नयेत. काय करावे?

______________________________

______________________________

६) आशाताई गावाच्या ४ गटांचा सगळा हिशोब मांडतात. त्यांनी स्वत: अर्थसाहाय्य (कर्ज) घेऊन ते कर्ज दुसऱ्यांच्या नावापुढे मांडलं. तुम्हाला हे कळले तर काय कराल?

______________________________

______________________________

७) पाटलाच्या सुनेला शेतावर येणाऱ्या मजूर बायकांकडून कळलं की गावात गट सुरू होऊन ३ महिने झालेत. ती गटात गेली. तिनं सारे पैसे भरले. ती म्हणाली, आता गट आमच्याच घरी घ्या. काय करावं?

______________________________

______________________________

८) गटाच्या कामासाठी सीमाताईला सारखे बाहेर जावे लागायचे. वर्षभरानंतर ती म्हणाली, माझ्याऐवजी दुसऱ्या कुणीतरी जावे. पण बाकी म्हणायच्या, 'तू प्रमुख झालीस तर तूच कर सारे काम. आम्हाला वेळ नाही.' तर काय करावं ?

______________________________

______________________________

★★★★★

# थोडी गणिते करू या

१ व २) आकडे लिहा. आकड्यांची बेरीज करा.

| |
|---|
| ३,७८०.६० |
| १५,००७.०० |
| ५,००२.०० |
| २३,७८९.६० |

**३) बेरीज करा –** आकडे लिहिताना एकाखाली एक लिहिले नाहीत, त्यामुळे काय गोंधळ होतो हे येथे बघायला मिळते. म्हणून

| |
|---|
| २६० |
| १,५४८ |
| ३ ३५ |
| ५ १ ७ |
| २ ५ ६ |
| २,४५६ |

**गटप्रमुखांना नक्की सांगा की आकडे लिहिताना**

१) एककाखाली एकक म्हणजे दशकाखाली दशक, शंभराखाली शंभर लिहावेत.

२) उजवीकडचा शेवटचा आकडा (एकक) आधी एकाखाली एक लिहावा.

३) आकडा खोडताना पूर्ण खोडावा. इथे जसा ५१चा ५७ केला तसा करू नये.

४) हजाराची तोंडी ढोबळ बेरीज करावी व बेरीज बरोबर आहे ना, ते पहावे.

**बहुतेक बेरजा या आकडे नीट न लिहिल्यामुळे चुकतात हे या उदाहरणावरून सांगावे.**

**४) ताळा करा**

| | बचत | परतफेड | व्याज | एकूण |
|---|---|---|---|---|
| | २५ | १०० | २० | १४५ |
| | २५ | २०० | १८ | २४३ |
| | २५ | | | २५ |
| | ५० | ४०० | ३२ | ४८२ |
| | २५ | ५० | १ | ७६ |
| एकूण | १५० | ७५० | ७१ | ९७१ |

| | |
|---|---|
| बचत | १५० |
| परतफेड | ७५० |
| व्याज | ७१ |
| एकूण | ९७१ |

आडवी बेरीज म्हणजे २५+१००+२०=१४५

उभी बेरीज म्हणजे २५+२५+२५+५०+२५=१५०

याप्रमाणे बेरजा करून आडवी बेरीज १५०+७५०+७१ = ९७१

उभी बेरीज १४५+२४३+२५+४८२+७६=९७१

आडवी बेरीज = उभी बेरीज =९७१ असे जमलेच पाहिजे.

अशी ताळ्याची कल्पना तपशिलात समजून द्यावी.

# थोडी गणिते करू या

**१) संख्या अंकांत लिहा –** तीन हजार सातशे ऐंशी रुपये साठ पैसे

पंधरा हजार सात रुपये

पाच हजार दोन रुपये

**२) वरील संख्या इथे लिहून त्याच संख्यांची बेरीज करा.**

बेरीज करा –

| |
|---|
| |
| + |
| + |
| |

**३) बेरीज करा –**

| |
|---|
| २ ६० |
| १,५४८ |
| ३ ३५ |
| ५ ९७ |
| २ ५ ६ |
| |

**४) ताळा करा**

बचत, परतफेड, व्याज, एकूण या सगळ्याची उभी व आडवी बेरीज करा.

| | बचत | परतफेड | व्याज | एकूण |
|---|---|---|---|---|
| | २५ | १०० | २० | |
| | २५ | २०० | १८ | |
| | २५ | | | |
| | ५० | ४०० | ३२ | |
| | २५ | ५० | १ | |
| एकूण | | | | |

| | |
|---|---|
| बचत | |
| परतफेड | |
| व्याज | |
| एकूण | |

गट प्रमुख प्रशिक्षण २

# सांगा पाहू व्याज काय ?

प्रशिक्षणाच्या वेळी आर्थिक सेवा शुल्क कसे काढावे हे गट प्रमुखांना शिकवावे. सेवा शुल्क दर (व्याज) गटामध्ये महिन्याचा असतो तो शंभरावर. म्हणून व्याज काढताना आकडा 'शे' मध्ये वाचायला शिकवावा व त्या आकड्याला दराने गुणावे. अनुभवाने यायला लागले की आकडे हजारात म्हणायला हरकत नाही.

उदा : २८०० हा वाचताना दोन हजार आठशे ऐवजी **अठ्ठावीस शे** असे म्हणावे.

२८ X २ = ५६ असे व्याज काढायचे असे तोंडी सांगावे.

नमुना म्हणून ७०० चे ..... ७ X २ = १४

असे फळ्यावर काढून दाखवावे. पुढील पानावरील गटप्रमुख प्रशिक्षण क्रमांक ३ सोडवताना वरीलप्रमाणे हिशोब करून १ ते ५ उदाहरणांतील व्याज काढायला सांगावे. साधारण १० मि. वेळ द्यावा. मग उत्तरे तपासावीत.

| येणे बाकी | व्याज |
|---|---|
| १,३०० रु. | २६ |
| १,६०० रु. | ३२ |
| २,१०० रु. | ४२ |
| १०,००० रु. | २०० |
| १५,२०० रु. | ३०४ |

मग कर्ज ५० रुपयांपेक्षा कमी असेल तर १ रु. व्याज व कर्ज ५० रु.पेक्षा जास्त असेल तर २ रुपये व्याज हे सांगावे. त्यानंतर ६ ते १० उदाहरणांचे व्याज काढायला सांगावे. मग उत्तरे तपासावीत. म्हणजे जर येणे बाकी ५०० ते ५५० असेल तर व्याज ११ द्यायचे पण ५५० पेक्षा एका रुपयाने जरी जास्त असले म्हणजे ५५१ ते ६०० मध्ये असेल तर व्याज १२ द्यायचे.

| येणे बाकी | व्याज |
|---|---|
| ५८० रु. | १२ |
| १४४० रु. | २९ |
| १०७० रु. | २२ |
| ८८५४ रु. | १७८ |
| १२२५० रु. | २४५ |

११ ते १५ उदाहरणांची उत्तरे पान २८ वर बघावीत.

# सांगा पाहू व्याज काय ?

बचत गटाचे महिन्याचे हिशोब गट प्रमुख करते. ते करताना ती गट सभासदांची बचत घेते, परतफेडीचा हप्ता घेते व येणे बाकी कर्जावरचे व्याज (आर्थिक सेवा शुल्क) घेते. ते घेताना कसा बरं विचार केला जातो?

**सांगा पाहू ? जर व्याजाचा दर द.म. २% असेल तर ......**

जर कमलची येणे बाकी ७०० रु असेल, तर कमलने गटात किती व्याज भरायचे?

उत्तर : कमलने ☐ रुपये व्याज गटात भरावे.

**अशा प्रकाराने खालील येणे बाकीवर व्याज काढावे.**

१ येणे बाकी १३०० असेल तर व्याज किती असेल ? रु. ☐

२ येणे बाकी १६०० असेल तर व्याज किती असेल ? रु. ☐

३ येणे बाकी २१०० असेल तर व्याज किती असेल ? रु. ☐

४ येणे बाकी १०००० असेल तर व्याज किती असेल ? रु. ☐

५ येणे बाकी १५२०० असेल तर व्याज किती असेल ? रु. ☐

६ येणे बाकी ५८० असेल तर व्याज किती असेल ? रु. ☐

७ येणे बाकी १४४० असेल तर व्याज किती असेल ? रु. ☐

८ येणे बाकी १०७० असेल तर व्याज किती असेल ? रु. ☐

९ येणे बाकी ८८५४ असेल तर व्याज किती असेल ? रु. ☐

१० येणे बाकी १२२५० असेल तर व्याज किती असेल ? रु. ☐

११ येणे बाकी ३५० असेल तर व्याज किती असेल ? रु. ☐

१२ येणे बाकी ९२० असेल तर व्याज किती असेल ? रु. ☐

१३ येणे बाकी १५०० असेल तर व्याज किती असेल ? रु. ☐

१४ येणे बाकी २७९० असेल तर व्याज किती असेल ? रु. ☐

१५ येणे बाकी ११०२० असेल तर व्याज किती असेल ? रु. ☐

★★★★★

पुढील पानावरील व्याजाचे टेबल त्यांना द्यावे, ते वाचायला शिकवावे. त्यानंतर ११ ते १५ उदाहरणांचे व्याज, टेबल वापरुन काढायला सांगावे. टेबल वापरल्यामुळे व्याज पटकन काढता येते हे लक्षात येऊ दे. असे झाल्यावर प्रमुखांचा गट घेण्याचा विश्वास वाढेल.

| येणे बाकी | व्याज |
|---|---|
| ३५० रु. | ७ |
| ९२० रु. | १९ |
| १,५०० रु. | ३० |
| २,७९० रु. | ५६ |
| ११,०२० रु. | २२१ |

★★★★★

# सेवाशुल्क दर तक्ता

पुढील पानावर दिलेल्या सेवाशुल्क दर तक्त्यात अर्थसाहाय्य येणे बाकी वर २% दराने सेवाशुल्क किती येईल याची उत्तरे दिली आहेत. हा तक्ता कसा वाचायचा ते गटप्रमुखांना शिकवावे. अनेकदा गणित येत असूनसुद्धा घाईमुळे, दडपणामुळे, अनवधानामुळे गटप्रमुखांच्या हातून सेवाशुल्क काढताना चुका होतात. त्या चुका होणं टाळण्यासाठी या तक्त्याचा वापर करावा. इथे ५० रुपयाच्या पुढे १ असे दिले आहे याचा अर्थ रु. १ ते ५० या रकमेपैकी कितीही पैसे येणे बाकी असतील तर सेवाशुल्क दरमहा २% दराने १ रु. द्यावे. जर येणे बाकी ५१ ते १०० असेल तर रु. २/– सेवाशुल्क होईल. या तक्त्यात १०,००० रु. अर्थसाहाय्य असेल तर सेवाशुल्क रु. २०० होईपर्यंत आकडेवारी दिली आहे. गटाचा अंतर्गत कर्जवाटप दर जर वेगळा असेल, उदा. ३% असेल, तर असा स्वतंत्र तक्ता करून गटप्रमुखांना द्यावा.

सेवाशुल्क दर २%

# सेवाशुल्क दर तक्ता

सेवाशुल्क दर २%

| अर्थ सहाय्य येणे बाकी | सेवाशुल्क | अर्थ सहाय्य येणे बाकी | सेवाशुल्क | अर्थ सहाय्य येणे बाकी | सेवाशुल्क | अर्थ सहाय्य येणे बाकी | सेवाशुल्क | अर्थ सहाय्य येणे बाकी | सेवाशुल्क | अर्थ सहाय्य येणे बाकी | सेवाशुल्क | अर्थ सहाय्य येणे बाकी | सेवाशुल्क | अर्थ सहाय्य येणे बाकी | सेवाशुल्क | अर्थ सहाय्य येणे बाकी | सेवाशुल्क येणे बाकी | अर्थ सहाय्य | सेवाशुल्क |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५० | १ | १०५० | २१ | २०५० | ४१ | ३०५० | ६१ | ४०५० | ८१ | ५०५० | १०१ | ६०५० | १२१ | ७०५० | १४१ | ८०५० | १६१ | ९०५० | १८१ |
| १०० | २ | ११०० | २२ | २१०० | ४२ | ३१०० | ६२ | ४१०० | ८२ | ५१०० | १०२ | ६१०० | १२२ | ७१०० | १४२ | ८१०० | १६२ | ९१०० | १८२ |
| १५० | ३ | ११५० | २३ | २१५० | ४३ | ३१५० | ६३ | ४१५० | ८३ | ५१५० | १०३ | ६१५० | १२३ | ७१५० | १४३ | ८१५० | १६३ | ९१५० | १८३ |
| २०० | ४ | १२०० | २४ | २२०० | ४४ | ३२०० | ६४ | ४२०० | ८४ | ५२०० | १०४ | ६२०० | १२४ | ७२०० | १४४ | ८२०० | १६४ | ९२०० | १८४ |
| २५० | ५ | १२५० | २५ | २२५० | ४५ | ३२५० | ६५ | ४२५० | ८५ | ५२५० | १०५ | ६२५० | १२५ | ७२५० | १४५ | ८२५० | १६५ | ९२५० | १८५ |
| ३०० | ६ | १३०० | २६ | २३०० | ४६ | ३३०० | ६६ | ४३०० | ८६ | ५३०० | १०६ | ६३०० | १२६ | ७३०० | १४६ | ८३०० | १६६ | ९३०० | १८६ |
| ३५० | ७ | १३५० | २७ | २३५० | ४७ | ३३५० | ६७ | ४३५० | ८७ | ५३५० | १०७ | ६३५० | १२७ | ७३५० | १४७ | ८३५० | १६७ | ९३५० | १८७ |
| ४०० | ८ | १४०० | २८ | २४०० | ४८ | ३४०० | ६८ | ४४०० | ८८ | ५४०० | १०८ | ६४०० | १२८ | ७४०० | १४८ | ८४०० | १६८ | ९४०० | १८८ |
| ४५० | ९ | १४५० | २९ | २४५० | ४९ | ३४५० | ६९ | ४४५० | ८९ | ५४५० | १०९ | ६४५० | १२९ | ७४५० | १४९ | ८४५० | १६९ | ९४५० | १८९ |
| ५०० | १० | १५०० | ३० | २५०० | ५० | ३५०० | ७० | ४५०० | ९० | ५५०० | ११० | ६५०० | १३० | ७५०० | १५० | ८५०० | १७० | ९५०० | १९० |
| ५५० | ११ | १५५० | ३१ | २५५० | ५१ | ३५५० | ७१ | ४५५० | ९१ | ५५५० | १११ | ६५५० | १३१ | ७५५० | १५१ | ८५५० | १७१ | ९५५० | १९१ |
| ६०० | १२ | १६०० | ३२ | २६०० | ५२ | ३६०० | ७२ | ४६०० | ९२ | ५६०० | ११२ | ६६०० | १३२ | ७६०० | १५२ | ८६०० | १७२ | ९६०० | १९२ |
| ६५० | १३ | १६५० | ३३ | २६५० | ५३ | ३६५० | ७३ | ४६५० | ९३ | ५६५० | ११३ | ६६५० | १३३ | ७६५० | १५३ | ८६५० | १७३ | ९६५० | १९३ |
| ७०० | १४ | १७०० | ३४ | २७०० | ५४ | ३७०० | ७४ | ४७०० | ९४ | ५७०० | ११४ | ६७०० | १३४ | ७७०० | १५४ | ८७०० | १७४ | ९७०० | १९४ |
| ७५० | १५ | १७५० | ३५ | २७५० | ५५ | ३७५० | ७५ | ४७५० | ९५ | ५७५० | ११५ | ६७५० | १३५ | ७७५० | १५५ | ८७५० | १७५ | ९७५० | १९५ |
| ८०० | १६ | १८०० | ३६ | २८०० | ५६ | ३८०० | ७६ | ४८०० | ९६ | ५८०० | ११६ | ६८०० | १३६ | ७८०० | १५६ | ८८०० | १७६ | ९८०० | १९६ |
| ८५० | १७ | १८५० | ३७ | २८५० | ५७ | ३८५० | ७७ | ४८५० | ९७ | ५८५० | ११७ | ६८५० | १३७ | ७८५० | १५७ | ८८५० | १७७ | ९८५० | १९७ |
| ९०० | १८ | १९०० | ३८ | २९०० | ५८ | ३९०० | ७८ | ४९०० | ९८ | ५९०० | ११८ | ६९०० | १३८ | ७९०० | १५८ | ८९०० | १७८ | ९९०० | १९८ |
| ९५० | १९ | १९५० | ३९ | २९५० | ५९ | ३९५० | ७९ | ४९५० | ९९ | ५९५० | ११९ | ६९५० | १३९ | ७९५० | १५९ | ८९५० | १७९ | ९९५० | १९९ |
| १००० | २० | २००० | ४० | ३००० | ६० | ४००० | ८० | ५००० | १०० | ६००० | १२० | ७००० | १४० | ८००० | १६० | ९००० | १८० | १०००० | २०० |

# पासबुक नोंदवा

| दिनांक | बचत जमा | एकूण जमा बचत | घेतलेले साहाय्य | साहाय्य परतफेड | येणे बाकी | आ.से.शुल्क | दंड | इतर जमा | एकूण जमा रक्कम | परत दिलेली बचत | संघटिका सही |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मार्च | २५ | २५ | | | | | | | २५ | | |
| एप्रिल | २५ | ५० | | | | | | | २५ | | |
| मे | २५ | ७५ | | | | | | | २५ | | |
| जून | २५ | १०० | | | | | | | २५ | | |
| जुलै | २५ | १२५ | | | | | | | २५ | | |
| ऑगस्ट | २५ | १५० | ५०० | | ५०० | | | | २५ | | |
| सप्टेंबर | २५ | १७५ | | १०० | ४०० | १० | | | १३५ | | |
| ऑक्टो. | | १७५ | | १०० | ३०० | ८ | | | १०८ | | |
| नोव्हेंबर | ५० | २२५ | | ३०० | ६ | | | | ५६ | | |
| डिंसेबर | २५ | २५० | | २०० | १०० | ६ | | | २३१ | | |
| जानेवारी | — | — | | — | | — | | | — | | |
| फेब्रुवारी | ५० | ३०० | | १०० | Nil | ४ | | | १५४ | | |

१. ऑक्टोबर व नोव्हेंबरची दोन्ही महिन्यांची भीमाबाईची बचत एकत्र नोव्हेंबरच्या रकान्यात नोंदवावी. ऑक्टोबरची बचत मिळाली म्हणून ऑक्टोबरच्या रकान्यात त्याची नोंद करू नये.

२. एकदा घेतलेले कर्ज रु. ५००/– घेतलेल्या महिन्यात एकदाच नोंदवायचे. फेड होईपर्यंत दर महिन्याला रु. ५०० नोंद करायची नाही. हा रकाना आजपर्यंतचे एकूण कर्ज असा नाही, हे लक्षात ठेवायचे.

३. बचत न भरल्यास इथे दंड सांगितलेला नाही. असा दंडाचा नियम जर गटात असेल तर तसे नोंदवावे. (उदा. नोव्हेंबर महिन्यात)

४. ज्या महिन्यात कर्ज दिले जाते त्याच महिन्यात येणे बाकीमध्येसुद्धा कर्जाची रक्कम नोंदवावी म्हणजे येणे बाकीवर व्याज काढणे सोपे जाते. (कधीकधी मागील येणे १०० असताना पुढील ५०० कर्ज त्याच सभासदाने घेतले तर तिची येणे बाकी ६०० दिसेल. नाहीतर, अशा प्रसंगी ५०० वर व्याज काढले जाते व आधीच्या कर्जातील येणे बाकी रु. १०० राहून जातात.)

५. सर्व कर्ज परत केल्यावर काही ठिकाणी 'NIL' नोंदवायची पद्धत आहे. त्यामुळे त्या कार्डावरील सभासदाच्या नावावर काही कर्ज बाकी नाही, असे लक्षात येते.

६ जानेवारीत भीमाबाई गैरहजर असल्यामुळे काहीही नोंद येथे करू नये.

७ फेब्रुवारीचा हिशोब करताना जानेवारीत भीमा आली नव्हती आणि तिच्या नावावर कर्ज होते. म्हणून व्याजाचा हिशोब करताना जानेवारीचे व्याज + फेब्रुवारीचे व्याज असे एकत्र नोंदवावे. म्हणजे २ महिन्याचे व्याज **फेब्रुवारीमध्ये** एकत्र नोंदवावे.

# पासबुक नोंदवा

सभासद नाव : भीमाबाई चौधरी
गाव : सणसवाडी
गट सुरुवात : मार्च ०६
अर्थसहाय्य दर : २% दरमहा

१ ) मार्च ०६ : गटातल्या सर्व जणींनी प्रत्येकी २५ रु बचत जमा करून गट सुरु केला.
२) एप्रिल /मे/ जून /जुलै : भीमाबाईने या चार महिन्यात फक्त बचत जमा केली.
३) ऑगस्ट : २५ रु. बचत जमा केली व ५०० रु कर्ज म्हणजेच अर्थसाहाय्य घेतले.
४) सप्टें : २५ रु. बचत भरली व परतफेड हप्ता १०० रु + व्याज म्हणजेच आर्थिक सेवा शुल्क ( आ.से.शु )असे गटात भरले.
५) ऑक्टो : पैसे नव्हते म्हणून भीमाने बचत भरली नाही. फक्त परतफेडीचे १०० रु. व व्याज भरले.
६) नोव्हें : २ महिन्याची बचत भरली, पण हप्ता भरला नाही. फक्त व्याज भरले.
७) डिसें : बचत भरली. २ महिन्याचा हप्ता भरला व व्याज भरले.
८) जानेवारी०७ : भीमाबाई गैरहजर राहिली.
९) फेब्रु : सर्व भरले बचत + फेड + आ. से. शुल्क (व्याज.)

| दिनांक | बचत जमा | एकूण जमा बचत | घेतलेले साहाय्य | साहाय्य परतफेड | येणे बाकी | आ.से.शुल्क | दंड | इतर जमा | एकूण जमा रक्कम | परत दिलेली बचत | संघटिका सही |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

स्पर्धा कशी घ्यावी

# स्पर्धा १

## कॅलक्युलेटरने बेरीज करा

**सूचना : कॅलक्युलेटर कसा वापरावा ते शिकवा.**

१. आकडा दाबा.

२. स्क्रीनवर बघा.

३. '+' दाबा मग बेरीज होते असं सांगा.

४. जे चिन्ह दाबू ती क्रिया होते. '–'(वजा) दाबल्यास वजाबाकी होते. '÷' दाबल्यास भागाकार होतो 'X' दाबल्यास गुणाकार होतो इ. तोंडी सांगावे.

५. आकडा दाबल्यावर स्क्रीनवर दिसतो, तो तपासायचा म्हणजे चूक होत नाही.

६. जर चुकलं तर कसं खोडायचं ते शिकवा.
पूर्णपणे खोडायचं असेल तर CE हे बटण दाबावे. फक्त शेवटचा आकडा नको असेल तर 'C' हे बटण दाबावे. हे करून दाखवा.

उदा : २ + ४ + ७ = करा

२ + ४ दाबल्यावर पुन्हा '+' दाबल्यावर स्क्रीनवर ६ हा आकडा दिसेल म्हणजे बेरीज होईल. मग पुढील बेरजेसाठी ७ दाबायचा आहे. शिकण्यासाठी ७ ऐवजी ७७ दाबा मग 'C' दाबा '=' दाबल्यावर पुन्हा ६ येईल, मग ७ दाबायचा '=' केल्यावर १३ आकडा दिसेल म्हणजे बेरीज होईल, असे करायला सांगावे. म्हणजे चूक कशी दुरुस्त करायची ते कळेल.

सरावासाठी त्यांना खालील बेरजा करायला सांगा.

सराव : २५ +१०० +१२=

२५ +१०० +२१=

५० +१०० +६२=

**सूचना :** मराठी १हा इंग्रजी 9 सारखा वाटतो तर इंग्रजी 9 हा मराठी ७ सारखा वाटतो,यात गोंधळ होतो . इंग्रजीत 4, 8 कधी कधी वाचता येत नाही. म्हणून **फळ्यावर मराठी आकड्यासमोर इंग्रजी आकडे काढावेत.**

★★★★★

# स्पर्धा १

## कॅलक्युलेटरने बेरीज करा

**स्पर्धकाचे नाव :** ______________________

**गाव :** ______________________ **दि. :** ____________

**सूचना : कॅलक्युलेटरच्या साहाय्याने कमीत-कमी वेळात अचूक बेरीज करा.**

| | बचत | परतफेड | व्याज | दंड | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | १०० | ७०० | १० | ६ | |
| | १०० | २०० | २० | ४ | |
| | १०० | | | | |
| | २०० | १०० | २ | १० | |
| | १०० | | ८ | | |
| | १०० | ५०० | १२ | ३ | |
| | १०० | ४०० | २२ | | |
| | १०० | | | | |
| | १०० | | | | |
| | १०० | १३०० | ६२ | | |
| | १०० | १००० | १०० | २५ | |
| | १०० | | | | |
| | | ३०० | ६ | | |
| | १०० | २०० | १६ | | |
| | १०० | ८०० | ४० | | |
| एकूण | | | | | |

येथे उभी व आडवी बेरीज करून लिहावी. कमीत कमी वेळात बरोबर बेरीज करणारीस पहिला क्रमांक !

**बेरीज करायला लागलेला वेळ येथे लिहावा**

मिनिटे : ______ सेकंद : ______

# चूक की बरोबर लिहा

१)...X दर महिन्यात निरोप देण्याची गरज नाही. पहिल्याच बैठकीत गटाच्या बैठकीची वेळ, तारीख व जागा नक्की करावी. लेखी निरोपाची गरज नाही. गट हा सगळ्यांचा, त्यामुळे सगळ्यांनी स्वत:हून यायचे.

२)...X 'मिनीटस्'ही बैठक झाल्यानंतर मिनीट बुकमध्ये लिहायची. काय झाले त्याचा अहवाल लिहिणं म्हणजे मिनीट्स लिहिणे. अजेंडा म्हणजेच कार्यक्रमपत्रिका म्हणजे बैठकीचे नियोजन. अजेंडा आधी व मिनीट्स नंतर लिहावीत.

३)...X कर्ज देणं घेणं हे गटातील सर्वांनी मिळून ठरवायचं. हे एकट्या प्रमुखानं ठरवायचं नसतं. चर्चा होऊनच ते ठरलं पाहिजे आणि ते सुद्धा सर्वांसमोर ! जेव्हा गटप्रमुख स्वत:च असे निर्णय घेऊ लागते तेव्हा समजावे की सदस्यांचा रस कमी होऊ लागला आहे. असे गट गटप्रमुखाच्या नावाने ओळखले जातात, गटाच्या नावाने नाही. म्हणून ते गट लवकरच बंद पडतात.

४)...X रेकॉर्ड गटप्रमुखानेच ठेवावे पण ते तिचेच काम असं नाही. बाकीच्यांनी तिला मदत करावी. अनेकदा गटप्रमुख सारी कामे हौसेने करते, विना मोबदला करते. तेव्हा तूच रेकॉर्ड ठेवावंस. किंवा 'रेकॉर्ड ठेवलंस की नाही'? असा जाब विचारण्याच्या भूमिकेत सभासदांनी जाऊ नये. लक्ष असावं हे मात्र नक्की.

५)...X 'बायका' कमी पडतात म्हणून पुरुषाच्या मदतीची गरज नाही. त्यांनी ते शिकलं पाहिजे. गट प्रमुखांच्या घरचेच पुरुष फक्त लक्ष जास्त घालू लागले तर गटाचे रूपांतर त्या घराच्या 'सावकारीत' व्हायला फारसा वेळ लागणार नाही हे लक्षात घ्यावे. गरज पडल्यास तरुण मंडळ कार्यकर्त्याची जरुर मदत घ्यावी.

६)...✔ आधी गटाची आर्थिक घडी नीट बसवावी. मग सामाजिक चर्चा. चांगले काम उभे राहण्यासाठी आर्थिक पाया पक्का असण्याची गरज असते. आर्थिक गडबड करणारा कुठलाही गट सामाजिक काम उभं करू शकत नाही.

७)...✔ विधान बरोबर आहे.

८)...X कॅश टॅली करण्यासाठी आधी जमाखर्च पत्रक तपासावे. तरीही जमणारी रोख ही आवश्यक रक्कमेशी जुळली नाही तर पासबुकं तपासावीत. जमाखर्च पत्रक हे रोख जुळण्याचं पहिलं पुस्तक.

९)...X पैसे गोळा करण्याचा दोन पद्धती आहेत. आधी बचत घ्यावी किंवा एकेकीचा पूर्ण व्यवहार एका वेळी करावा. यात दोन्ही पद्धती बरोबर आहेत. पण पद्धत काय आहे त्यावर चर्चा होणं महत्त्वाचं. याच वेळी पैसे जमा करताना नोटा कशा ठेवतात हेही विचारावे. एका प्रकारच्या नोटा एकत्र, म्हणजे १०० च्या व ५० च्या नोटांचे वेगळे गठ्ठे करावेत असं सांगावे.

१०)...X बँकेत गटातील महिलांनीच गेलं पाहिजे. हेच निमित्त आहे बँक समजून घेण्याचं. एखाद्या वेळी पुरुष मंडळी गेली तर बिघडत नाही, पण बायकांनी बँकेत जायला वेळ काढायला हवा. गरज पडल्यास गटाने दिवसाचा रोज द्यावा. प्रवासखर्च द्यावा.

११)...X गट सभासदांचा आहे, गटाची हिशोबाची घडी बसवायला संस्था मदत करते. पण सर्व जबाबदारी सभासदांचीच. गटातल्या नफ्याच्या त्याच तर मालकिणी असतात. मग जबाबदारी त्यांचीच नको का?

१२)...✔ हिशोब तपासायचे म्हणजे स्वत:चं कर्ज, बचत, व्याज दिलं तेवढंच लिहिलंय ना? येणे बाकी आपल्याला मान्य आहे ना? याची खात्री करावी.

★★★★★

# चूक की बरोबर लिहा

**खालील विधाने बरोबर की चूक ते पुढील चौकटीत लिहावे**
**बरोबरसाठी (✓) व चूकसाठी (X)अशी खूण करा.**

१) दर महिन्याच्या बैठकीचा निरोप सर्व महिलांना लेखी द्यावा ..........

२) बैठकीपूर्वी, होणाऱ्या बैठकीची मिनीटस् व्यवस्थित लिहून ठेवावीत. ..........

३) कुणाला कर्ज द्यायचे हे प्रमुखांनी ठरवून ठेवावे, म्हणजे नंतर चर्चा नको ..........

४) गटप्रमुख ही महत्त्वाची व्यक्ती आहे. रेकॉर्ड ठेवणं ही फक्त तिची जबाबदारी आहे. ..........

५) हिशोबात चूक होण्यापेक्षा गटप्रमुखांच्या घरच्या पुरुषांची मदत घ्यावी. ..........

६) बैठकीत सामाजिक चर्चा होणंसुध्दा महत्त्वाचं, त्यानं गटाचं नाव सर्वांपर्यंत पोहोचतं. ..........

७) मागील बैठकीत झालेले विषय या बैठकीत वाचून दाखवावेत. ..........

८) प्रत्येकीचे सभासद पुस्तक बघून गटाची कॅश टॅली करता येते. ..........

९) पैशाचे व्यवहार करताना आधी सर्वांची बचत घ्यावी, मग बाकी व्यवहार करावेत. ..........

१०) बँकेत पुरुषांनी गटाचे पैसे भरावेत, त्यामुळे बायकांचा खूप वेळ वाचतो. ..........

११) गटाचा हिशोब तपासायची जबाबदारी सर्वस्वी संस्थेचीच. ..........

१२) वर्षातून एकदा तरी सर्व सभांसदांनी आपापले हिशोब तपासावेत. ..........

★★★★★

**प्रशिक्षकासाठी टिपण– गटप्रमुख प्रशिक्षण ७**

# ताळेबंद बनवा

**सूचना :** खोपी गावातील अंबिकामाता गटाच्या सभासदांचा १२ महिन्यांचा एकत्रित हिशोब उजव्या बाजूस दिलेला आहे. त्यावरून खाली दिलेली तीन टेबले पूर्ण भरण्याची सूचना द्यावी. ती टेबले भरताना :

**गटाचे पैसे किती?** (टेबल १)

| | |
|---|---|
| बचत | २२२०० |
| व्याज | १४६५ |
| दंड | ५० |
| इतरजमा | १०० |
| **एकूण** | **२३८१५** |

टेबल १ ची बेरीज २३८१५ यायला पाहिजे. या टेबलमध्ये गटातील सभासदांनी वर्षभरात रोख किती जमा केली ते समजते. हे टेबल रोखीचा ताळा करण्यासाठी उपयुक्त आहे.

**अधिक माहिती** (टेबल २)

| | |
|---|---|
| पासबुकावर बँकेत जमा | ३५१२ |
| प्रवास खर्च | ६०० |
| चहापान | २०० |
| **एकू ण** | **४३१२** |

टेबल २ ची बेरीज ४३१२ यायला पाहिजे. या टेबलमध्ये कर्जाशिवाय गटातील पैसे कुठे–कुठे गेले ते समजते.

**रोखीचा ताळा** (टेबल ३)

| | |
|---|---|
| येणे बाकी | १८५०० |
| हातातील शिल्लक* | **१०१५** |
| बँकेत जमा | ३५०० |
| इतर खर्च | ८०० |
| **एकू ण** | २३८१५ |

टेबल ३ मध्ये गटाचे पैसे कुठे–कुठे आहेत ते समजते. म्हणून टेबल १ची एकूण ही टेबल ३च्या एकूणशी जुळायलाच हवी. असे झाले तरच ताळेबंद जुळेल. व गटाचा हिशोब चोख असल्याची खात्री पटेल. इथे जाणीवपूर्वक बेरीज जुळणार नाही असे केले आहे. म्हणून, सभासदांशी चर्चा करावी की ही रक्कम कुठे–कुठे असू शकते? त्यासाठी खर्च पुन्हा एकदा तपासावा, नाहीतर हा फरक गटप्रमुख/खजिनदार अशा जबाबदार व्यक्तीकडे आहे असे समजावे. म्हणून,

१८५००+३५००+८०० =**२२८००**

२३८१५–२२८००=१०१५

***फरक = हातातील शिल्लक = रु १०१५ असे धरले आहे.**

**असे केल्यामुळे** टेबल ३ ची बेरीज २३८१५ येईल व रोखीचा ताळा पूर्ण होईल.

** पासबुकावर बँकेत जमा दिसणारी रक्कम रूपये ३५१२ आहे. प्रत्यक्षात गटाने बँकेत रूपये ३५०० जमा केलेले आहेत. याचा अर्थ बँक व्याज = ३५१२– ३५००= १२ असा होतो.

★★★★★

# ताळेबंद बनवा

अंबिकामाता बचत गटाचे बँकेमध्ये खाते आहे. गटाला बँकेकडून रू. २५,०००/- कर्ज हवे आहे. हे कर्ज दरमहा रू. २,०००/- प्रमाणे गट परतफेड करणार आहे. गटात थकबाकीदार नाही. हे कर्ज गटात २% द.म. प्रमाणे गट ५ जणींना देणार आहे. चला, बँकेकडून कर्ज घेण्यासाठी अंबिकामाता गटाचा हिशोब जुळवायला गटाला मदत करूया.

## अंबिकामाता बचत गटहिशेब

**खोपी गाव, ता. भोर, जि. पुणे.**

गट सुरू दिनांक – ७ एप्रिल ०६ | गटाचा ३१ /०३ /०७ अखेरचा हिशेब

| | नाव | बचत | फेड | सेवाशुल्क | दंड | इतर | एकूण | कर्ज | येणेबाकी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुलोचना जगताप | ११०० | १००० | १५० | | ५ | २२५५ | ३००० | २००० |
| २ | शारदा मांढरे | १२०० | ३००० | २१० | ५ | ५ | ४४२० | ४००० | १००० |
| ३ | वैशाली शिंदे | १२०० | | | | ५ | १२०५ | | |
| ४ | विमल गोगावले | १२०० | २००० | १०० | | ५ | ३३०५ | २००० | |
| ५ | भारती जाधव | १२०० | १५०० | ६० | ५ | ५ | २७७० | १५०० | |
| ६ | सविता मोरे | १२०० | | | | ५ | १२०५ | | |
| ७ | रत्ना वाडकर | १२०० | | | | ५ | १२०५ | | |
| ८ | ताराबाई गोळे | ९०० | | २० | | ५ | ९२५ | १००० | १००० |
| ९ | चांगुणा वाशिवले | १२०० | | २० | ५ | ५ | १२३० | १००० | १००० |
| १० | बायजा शेलार | १२०० | | | | ५ | १२०५ | | |
| ११ | रंजना गोगावले | १००० | | | | ५ | १००५ | | |
| १२ | जना खवले | १२०० | ४५०० | ३३५ | | ५ | ६०४० | ६००० | १५०० |
| १३ | लक्ष्मी बोरकर | १२०० | | | | ५ | १२०५ | | |
| १४ | अलका सुर्वे | १२०० | | | १५ | ५ | १२२० | | |
| १५ | जानकी नलावडे | १००० | | ३४० | | ५ | ३३४५ | ५००० | ३००० |
| १६ | भागुबाई तांबट | ३०० | | | | ५ | ३०५ | | |
| १७ | सुमन भालघरे | १२०० | २५०० | १५० | २० | ५ | ३८७५ | २५०० | |
| १८ | सुनंदा शिवरकर | ११०० | | | | ५ | ११०५ | | |
| १९ | वैशाली बोरकर | १२०० | | ८० | | ५ | १२८५ | ४००० | ४००० |
| २० | सुशिला मेढेकर | १२०० | | | | ५ | १२०५ | ५००० | ५००० |
| | एकूण | २२२०० | १६५०० | १४६५ | ५० | १०० | ४०३१५ | ३५००० | १८५०० |

**गटाचे पैसे किती?** (टेबल १)

| | |
|---|---|
| बचत | |
| व्याज | |
| दंड | |
| इतरजमा | |
| **एकूण** | |

**अधिक माहिती** (टेबल २)

| | |
|---|---|
| बचतखाते २०८७ वरील जमा रक्कम | ३५१२ |
| प्रवास खर्च | ६०० |
| चहापान | २०० |
| **एकूण** | |

**रोखीचा ताळा** (टेबल ३)

| | |
|---|---|
| येणे बाकी | |
| हातातील शिल्लक | |
| बँकेत बचतखाते २०८७ वर जमा केलेले पैसे | ३५०० |
| इतर खर्च | |
| **एकूण** | |

टेबल १ची एकूण व टेबल ३ ची एकूण एकमेकांशी जुळायला हवी, तरच ताळेबंद जुळेल, फरक असेल तर खर्च पुन्हा तपासावा. तसा खर्च काही दिसत नसेल तर, हातातील शिल्लक तपासावी तिथे फरक नक्की सापडेल. हा फरक हातातील शिल्लक पुढे लिहावा.

**प्रशिक्षकासाठी टिपण – गटप्रमुख प्रशिक्षण ७ पुढे चालू ...**

**या पानावरील माहिती लिहिताना गटाच्या हिशोबाचा संदर्भ घ्यावा. त्यावरून बचत गटाला बँकेकडून कर्जा (लिंकेज) साठी लागणारी आवश्यक माहिती लिहावी.**

१) गटाचे नाव –अंबिकामाता

२) गाव खोपी – ता. भोर, जि. पुणे

३) स्थापना – एप्रिल ०६

४) बचतगट बँकेखाते नं. – बचत खाते २०८७

५) बचतगट सभासद संख्या –२०

६) सभासदांची मासिक वर्गणी – रु. १००/–(वर्षाच्या हिशोबात रु. १२०० बचत दिसते म्हणजे मासिक बचत रू.१०० असणार)

७) गटाचे तेरीजपत्रक

| जमा | रुपये | खर्च | रुपये |
|---|---|---|---|
| एकूण बचत | २२२०० | कर्ज येणे बाकी | १८५०० |
| एकूण व्याज | १४६५ | व्याज येणे बाकी | ० |
| बँकेकडून बचतीचे व्याज | १२ | इतर खर्च | ८०० |
| दंडाची रक्कम जमा | ५० | बँक बचत खात्यावरील शिल्लक | ३५१२ |
| इतर जमा | १०० | हातात रोख शिल्लक | १०१५ |
| | २३८२७ | | २३८२७ |

८) गटाचे जमा – खर्च पत्रक

| जमा | रुपये | खर्च | रुपये |
|---|---|---|---|
| सभासदांकडून कर्जावरील व्याज जमा | १४६५ | बँकेत कर्जावरील व्याज खर्च दिले | – |
| बँकेकडून बचत/ठेवीवरील व्याज | १२ | इतर किरकोळ खर्च | ८०० |
| इतर जमा व दंड इ. | १५०** | निव्वळ नफा (गटाचा) | ८२७ |
| अ | १६२७ | ब | १६२७ |

**गटाचा निव्वळ नफा = (अ) १६२७ – (ब) ८०० = ८२७**

९) गटामधील थकबाकीदार नाही रक्कम रु. नाही

१०) गटामधील सभासदांकडून दंड रक्कम जमा रु. ५०

११) बचत गट घेत असलेल्या व्याजाचा दर २ %

१२) बँकेकडून एकूण कर्जाची मागणी रु. २५०००/–

१३) किती सभासदांना कर्ज ५

१४) बँकेचा कर्ज परतफेडीचा हप्ता २०००/–

★★★★★

** इतर जमा मध्ये दंड रु. ५० धरून एकूण रु. १५० झाले.

# ताळेबंद बनवा पुढे चालू ....

**(पान ३७ वरील माहितीच्या आधारे)**

बचत गटाला बँकेकडून कर्ज (लिंकेज) साठी लागणारी आवश्यक माहिती

१) गटाचे नाव ____________________

२) गाव __________ ता. __________ जि. __________

३) स्थापना ____________________

४) बचतगट बँकेखाते नं. ____________________

५) बचतगट सभासद संख्या __________ सभासदांची मासिक वर्गणी रु. __________

६) **गटाचे तेरीज पत्रक**

| **जमेच्या बाबी** | रुपये | **खर्चाच्या बाबी** | रुपये |
|---|---|---|---|
| एकूण बचत | | कर्ज येणे बाकी | |
| एकूण व्याज | | व्याज येणे बाकी | |
| बँकेकडून बचतीचे व्याज | | इतर खर्च | |
| दंडाची रक्कम जमा | | बँक बचत खात्यावरील जमा | |
| इतर जमा | | हातात रोख शिल्लक | |
| **एकूण** | | **एकूण** | |

७) **गटाचे जमा-खर्च पत्रक**

| **जमा** | रुपये | **खर्च** | रुपये |
|---|---|---|---|
| { सभासदांकडून कर्जावरील व्याज | | बँकेत कर्जावरील व्याज } | |
| जमा | | खर्च दिले | |
| बँकेकडून बचत/ठेवीवरील व्याज | | इतर किरकोळ खर्च | |
| इतर जमा व दंड इ. | | गटाचा निव्वळ नफा ❋ | |
| **एकूण** | | **एकूण** | |

❋ गटाचा निव्वळ नफा **= जमा - खर्च**

(तोटा असणाऱ्या गटास कर्ज मिळणार नाही. तोटा असल्यास तो जमा बाजूला येईल. नफा आहे म्हणून इथे खर्च बाजूला दिसतो.)

८) गटामधील थकबाकीदार __________ रक्कम रु __________

९) गटामधील सभासदांकडून दंड रक्कम जमा __________

१०) बचत गट घेत असलेल्या व्याजाचा दर ____ %

११) बँकेकडून एकूण कर्जाची मागणी रु. __________

१२) किती सभासदांना कर्ज __________

१३) बँकेचा कर्ज परतफेडीचा हप्ता __________

★★★★★

# स्पर्धा २

## रक्कम मोजा

गटप्रमुख जी कामे करतात त्यात पैसे मोजायचे काम गटप्रमुख या नात्याने त्या पहिल्यांदाच करत असतात. एरवी पैसे मोजणे वेगळे असते. गटासमोर पैसे मोजणे वेगळे असते कारण हे काम गटातील सर्वांसमोर करायचे असते. जमलेली रक्कम जमाखर्च पत्रकातील रकमेशी जुळवायला हवी असते. यात अचूकता महत्त्वाची !

गटात रक्कम मोजताना दडपण येते. त्यामुळे येत असणारे काम करतानाही गोंधळायला होते. असे होऊ नये म्हणून सरावासाठी अशी स्पर्धा घ्यावी.

**स्पर्धेचे नाव – रक्कम मोजा !**

**साहित्य –** पाच रकमांची स्वतंत्र बंडले, कागद, पेन, सेकंदकाटा असलेले घड्याळ.

**सूचना :**

१) साधारण ३,०००/– च्या आसपास पाच रकमांची स्वतंत्र बंडले करावीत. प्रत्येकात वेगवेगळी रक्कम असावी. (उदा.– २,८७०/–, २,९४५/–, ३,१६२/– इ.) प्रत्येक बंडलात १०००, ५००, १००, ५०, २०, १०, ५, नाणी असे सर्व प्रकार असतील हे जाणीवपूर्वक बघावे.

२) स्पर्धा गटासमोर घ्यावी.

३) वेळ मोजणारी व्यक्ती स्वतंत्र असावी व तिने मोठ्यांदा वेळ सांगत राहावी. उदा.– ३ मिनीटे १५ सेकंद, ३ मि. ३० सेकंद, ३ मि. ४५ सेकंद असे.

४) एकाच वेळी पाच जणींना गटासमोर पैसे मोजायला द्यावे.

५) रक्कम मोजून झाल्यानंतर दिलेल्या कागदावर तिच्या नावापुढे लागलेला वेळ लिहिण्यास सांगावा.

### निकालपत्रक

खालीलप्रमाणे टेबल बनवावे. आधी बरोबर रक्कम असणाऱ्यांची यादी करावी व कमीत कमी वेळात मोजणारीचा पहिला क्रमांक काढावा.

उदा.– पाकिटात २,९४५/– रक्कम होती.

| | नाव | रक्कम | वेळ |
|---|---|---|---|
| १ | सीमा | २८४५ | २ मिनिटे ३० सेकंद |
| २ | सविता | २९४५ | ३ मिनिटे १० सेकंद |
| ३ | गीता | ३१०५ | २ मिनिटे ४० सेकंद |
| ४ | भीमा | २९४५ | ३ मिनिटे ४० सेकंद |

यात भीमा व सविता या दोघींनी रक्कम बरोबर मोजली पण, क्रमांक २ची सविता ही पहिली येईल. कारण तिने बरोबर रक्कम भीमापेक्षा कमी वेळात मोजली.

★★★★★

# टप्पा ३ : संघटिका प्रशिक्षण




गटाची परिणामकारकता ही संस्थेच्या संघटिकेवर अवलंबून असते. गटांबद्दल नुसती आस्था असून पुरत नाही; त्यांना योग्य दिशेने नेण्यासाठी संघटिकांनीही जाणीवपूर्वक प्रशिक्षण घेण्याची गरज असते. संघटिकेने गटप्रमुखांच्यापुढे दोन पावले असले पाहिजे. तरच तिचे व्यवस्थापन अधिक परिणामकारक होईल. यासाठी संघटिकांसाठीच्या प्रशिक्षणाची रचना केलेली आहे. तिने सभासदांसाठी व गटप्रमुखांसाठी तयार केलेली प्रशिक्षणे स्वत: सोडवायची आहेत. मगच या प्रशिक्षणाकडे यायचे आहे. संघटिकेने पहिल्या दोन टप्प्यांवरील प्रशिक्षणांवर प्राविण्य मिळविलेले असले पाहिजे. तसेच गटावर नियंत्रण करताना गटातील सर्वांचा फायदा होणे, गटात एकजिनसीपणा येणे हे तिला पाहता येईल. त्याकरिता आवश्यक असलेली सर्व माहिती संघटिका प्रशिक्षणमध्ये दिलेली आहे. प्रत्यक्ष सोडवायचे एकच प्रशिक्षण आहे.

या प्रशिक्षणांमधून पुढील गोष्टी लक्षात येतील.

**१. काय काळजी घ्याल –** रेकॉर्डसंबंधी गटावर नियंत्रण ठेवताना काय काळजी घ्यायची, चुका कशा तपासायच्या याची माहिती यामध्ये दिली आहे.

**२. गटांवर नियंत्रण ठेवताना –** गटांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कोणत्या गोष्टींकडे संघटिकेचे लक्ष असले पाहिजे, नियंत्रणासाठी प्रत्यक्ष हिशोबात पाहावयाच्या गोष्टी, बँकेचे कर्ज घेताना संघटिकेने लक्षात घ्यायचे मुद्दे, गटाचा फायदा संघटिकेने जास्तीत जास्त पाहिला पाहिजे. या दृष्टीने सूचना यात सांगितल्या आहेत.

**३. आदर्श गटाचा हिशोब –** गटाच्या नियमांप्रमाणे खरोखरच गट चालला तर गटाच्या उलाढाली महिन्यागणिक कशा वाढत जातात व किती मोठे व्यवहार गटाच्या जीवावर बेतता येतात, याचा अंदाज येतो. या प्रशिक्षणात दिलेल्या तक्त्याआधारे संघटिकेला गटावर नियंत्रणही ठेवता येईल. आदर्श गटाच्या हिशोबाप्रमाणे आपला गट चालवायचा असेल तर कोणती गृहितके समजून घ्यावीत, हे यावरून संघटिकेच्या लक्षात येईल.

**४. गटात पैसे खेळल्यामुळे –** गट व्यवस्थित नियमांप्रमाणे चालणारा असेल तर आठ महिन्यात किमान प्रत्येक महिलेला अर्थसाहाय्य व पैसे व्यवस्थित फिरल्यामुळे व्याज जास्ती मिळते, हे लक्षात येते. संघटिकेने फक्त गट व्यवस्थित चालले आहेत ना हे पाहणे अपेक्षित नसून त्यात सर्वांचा जास्तीत जास्त फायदा होतो आहे ना, हे पाहिले पाहिजे.

**५. जमाखर्च पत्रक बनवा –** या प्रशिक्षणात, जुलै महिन्याच्या दिलेल्या पत्रकाच्या आधारे ऑगस्ट महिन्यात कसा हिशोब असेल, यावर विचार करायचा आहे. या प्रशिक्षणातून गटाच्या पुढे पाहण्याची संघटिकेची दृष्टी तयार होण्यास मदत होईल.

**६. शिकविणारे अनुभव –** शिकवणाऱ्या अनुभवांद्वारे बचतगटाच्या विश्वातील अनेकानेक व्यक्तींच्या विचार करण्याच्या व वागण्याच्या पद्धती पाहून योग्य दिशेने विचार करण्यासाठीचे विषय काही प्रसंगांच्या माध्यमातून संघटिकांपर्यंत पोहोचवलेले आहेत.

★★★★★

# काय काळजी घ्याल?

## रेकॉर्डसंबंधी

जमाखर्च पत्रक हे हिशोबाचे सर्वात महत्त्वाचे पत्रक. दर महिन्याचा हिशोब त्यात नोंदवायचा. ही नोंद झाली की जमेची बेरीज करायची व ती बेरीज जमा झालेल्या गटाच्या रोख रकमेशी जुळवायची. ही रक्कम जुळली की हिशोबाची नोंद बरोबर आहे असे समजावे. पण कधीकधी जमाखर्च पत्रकातील जमा, रोख जमलेल्या पैशाशी जुळत नाही. तेव्हा खरं गटप्रमुखाची परीक्षा असते. ही जमा बेरीज (लेखी नोंद) व रोख जमा यातील फरक कसा बरं शोधायचा? त्यासाठी :-

**१) नोटा मोजताना घ्यायची काळजी**

अ) नोटा मोजायची सवय नसेल तर एकदम रक्कम मोजण्याऐवजी, आधी एकेका प्रकारच्या नोटा मोजाव्यात. उदा : रु. ५ X १७ असे लिहावे. सर्व नोटा मोजून झाल्यावर मग गुणाकार करावा.

आ) नोटा क्रमाने लिहाव्यात म्हणजे सर्व धरल्या जातात. नाहीतर एखादा प्रकार लिहायचाच राहून जातो.

१००० X =
५०० X =
१०० X =
५० X =
२० X =
१० X =
५ X =
नाणी
___

२) जमलेली रक्कम व जमाखर्च पत्रकातील नोंद जमत नसेल तर कारणे शोधून ती जमायलाच हवी.
जर :-

* ५,१०,२०,५०,५०० अशा फरकाने रोख रक्कम जमत नसेल, तर त्या प्रकारच्या नोटा तपासाव्यात. एखाद्या नोटेमुळे हा फरक पडू शकतो.
* २०/२५ अशा बचतीच्या रकमेने फरक पडत असेल, तर लेखन तपासावे.
* १,१०,१०० अशा फरकाने जमत नसेल, तर बेरजेचे हातचे बरोबर घेतले आहेत ना, ते तपासावे.
* गटाचा हिशेब झाल्यावर एखादी सभासद उशिरा आली असेल, तर तिचे जमा पैसे नोंदवून बेरजेत घेतले आहेत ना, ते तपासावे.

३) नोटा नेहमी २ वेगवेगळ्या व्यक्तींनी मोजाव्यात.

४) गटात मोठे व्यवहार होत असतील, तर पैसे घेतानाच १०००/- रुपयांची बंडले करून रबर बँड लावून ठेवावेत, म्हणजे तेच पैसे पुन्हा पुन्हा मोजण्यात वेळ जात नाही.

★★★★★

# गटावर नियंत्रण ठेवताना

संघटिकेने गटासंबंधी हिशोब बघताना सभासद पासबुक, जमाखर्च पत्रक, खातेवही, मिनिट बुक (अहवाल नोंद वही) या पुस्तकांविषयी माहिती स्वत: करून घ्यावी व गटप्रमुखांना करून द्यावी.

**गटावर नियंत्रण ठेवताना**

(१) दरमहा जमाखर्च पत्रकांची जमा= खर्च (जमा व खर्च या रकमांची जुळणी) होते ना, हे तपासावे.

(२) मागील रोख शिल्लक पुढे ओढली आहे ना, याची खातरजमा करावी.

(३) दरसाल सभासद पुस्तकांची, सभासद खातेवहीशी तपासणी व जुळणी करावी. ह्या दोन नोंदींमध्ये काही फरक नाही ना, याची खात्री करावी.

**बँक लिंकेज**

बचत गटाचे बँकेत खाते काढून व्यवहार व्यवस्थित असेल तर बँक गटाला कर्ज देते. हे कर्ज बँकेने 'गटाला' दिलेले असते. ते गटाने पुढे सभासदाला द्यायचे असते. सभासदाने हे कर्ज गटातच फेडावयाचे असते व गट मग बँकेत 'गटाचे कर्ज परतफेड' करणार असतो. अशा कर्जासाठी बचत गटाची बचत जामीन असते. ह्या कर्जफेडीला संपूर्ण गट जबाबदार असतो, गटातील कोणी एकच सभासद नाही, हे गटाने विसरू नये.

गटातून सभासदाला मिळालेले कर्ज हे गटाच्या नियमाने जो व्याज दर असेल त्या प्रमाणे सभासदाला मिळालेले असते पण बँक गटाला बँकेच्या नियमाने कर्ज देते. (८.५% ते १३% दर साल म्हणजे अंदाजे पाऊण ते सव्वा टक्का दरमहा) गटात बँकेचे कर्ज वाटप करून घेतलेल्या सभासदाने बँकेपेक्षा जास्त दराने म्हणजेच गटाच्या दराने कर्ज फेड करावी म्हणजे गटाचा आर्थिक फायदाही होतो. ज्यांनी थेट कर्ज वापरलेले नाही, त्या सभासदांनाही त्याचा फायदा एकूण सेवा शुल्क अधिक जमल्याने होतो व गट सुरळीत चालतो. हे सर्व व्यवहार करताना संघटिकेने अत्यंत काळजीपूर्वक काम केले पाहिजे. कधी कधी या कामांमध्ये विविध प्रकारच्या धोक्यांना सामोरे जावे लागते.

गटप्रमुखांनी गटाच्या नावावर बँकेतून वैयक्तिकरित्या कर्ज काढले आहे व गटाला त्याबाबत पुरेसे सांगितलेले नाही, असेही घडल्याची उदाहरणे आहेत. तसेच बँकेतून कमी व्याजदराने काढलेले कर्ज गटात फेडताना गटाच्या दराने न फेडता बँकेच्याच दराने फेडून गटाचे व्याजाबाबतचे नुकसान झाले आहे, असेही काही ठिकाणी घडलेले आहे. सभासदांनी याबाबत सावध असावे व नीट अभ्यास करूनच कर्ज अर्जावर सह्या कराव्यात, याची जाणीवजागृती संघटिकेने करावी. संघटिकेने स्वत:च्या वैयक्तिक लाभासाठी ही रचना वापरणे निषिद्ध आहे.

★★★★★

# आदर्श गटाचा हिशोब

आदर्श गटाच्या हिशोबाचा तक्ता सोबत जोडत आहे. त्यासाठी खालील गोष्टी गृहीत धरल्या आहेत.

१) गट सभासद संख्या २०.

२) दरडोई बचत २५ रुपये.

३) दरमहा बचत २५ रु. X २० = ५०० रु. सर्व जणी देणारच.

४) सेवाशुल्क दर २% दरमहा

५) परतफेड नियम : घेतलेले कर्ज समान ५ हप्त्यात परत करायचे (गणित करताना अशीच परतफेड होईल असे गृहीत धरले आहे.)

६) (समजा) पहिल्या महिन्यापासून कर्ज देवाण-घेवाण सुरू केली आहे.

७) जमा झालेली सर्व रक्कम कर्ज म्हणून वाटप केली आहे.

८) गट बंद प्रक्रिया शेवटचे ४ महिने सुरू होते त्यावेळी खात्रीने कमी हप्त्यात परतफेड होणारी कर्जे दिली आहेत म्हणजे उदा. ३२ व्या महिन्यात जमणारे ७७८६/- ४ महिन्यात रु. १९४७ प्रमाणे परतफेड होईल तर ३४ व्या महिन्यात जमलेले रु. १००३८ दोन महिन्यातच रु. ५०१९ प्रमाणे परतफेड होतील असे गृहीत धरले आहे. खरे तर ही प्रक्रिया इथे गणितापुरती ३ वर्षासाठी गृहीत धरली आहे एरवी गट हे दीर्घकाळ चालणारे असतात.

जर असे झाले तर ३ वर्षात मिळून काय घडते, ते खाली दिले आहे.

| कालावधी (३६ महिने) ३ वर्ष | |
|---|---|
| गटाची एकूण बचत | १८००० |
| सेवाशुल्क | ७९९७ |
| एकूण उलाढाल | १७७५७० |
| एकूण कर्ज | १५१५७२ |
| बचत + व्याज | २५९९७ |

* २५ रुपये बचत करणाऱ्या गटात ३ वर्षात मिळून १८,००० बचत व ७,९९७ व्याज असे प्रत्यक्ष २५,९९७ रुपये जमा होतात पण गटातल्या गटात पैसे खेळते राहिल्यामुळे १,५१,५७२/- रु. इतकी कर्जाची गरज पुरवली जाते हे विशेष.

★★★★★

# आदर्श गटाचा हिशोब

| महिना | बचत | परतफेड | सेवाशुल्क | जमा | कर्ज | परतफेड हप्ता | | | | | एकूण परत फेड | आजवरची जमा | आजवरची परतफेड | आजवरचे जमा भांडवल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५०० | | | ५०० | ५०० | | | | | | | ५०० | | ५०० |
| २ | ५०० | १०० | १० | ६१० | ६१० | १०० | | | | | १०० | १११० | १०० | १०१० |
| ३ | ५०० | २२२ | २० | ७४२ | ७४२ | १०० | १२२ | | | | २२२ | १८५२ | ३२२ | १५३० |
| ४ | ५०० | ३७० | ३१ | ९०१ | ९०१ | १०० | १२२ | १४८ | | | ३७० | २७५३ | ६९२ | २०६१ |
| ५ | ५०० | ५५१ | ४१ | १०९२ | १०९२ | १०० | १२२ | १४८ | १८० | | ५५१ | ३८४५ | १२४३ | २६०२ |
| ६ | ५०० | ७६९ | ५२ | १३२१ | १३२१ | १० | १२२ | १४८ | १८० | २१८ | ७६९ | ५१६६ | २०१२ | ३१५४ |
| ७ | ५०० | ९३३ | ६३ | १४९६ | १४९६ | २६४ | १२२ | १४८ | १८० | २१८ | ९३३ | ६६६२ | २९४५ | ३७१७ |
| ८ | ५०० | १११० | ७४ | १६८५ | १६८५ | २६४ | २९९ | १४८ | १८० | २१८ | १११० | ८३४७ | ४०५६ | ४२९१ |
| ९ | ५०० | १२९९ | ८६ | १८८५ | १८८५ | २६४ | २९९ | ३३७ | १८० | २१८ | १२९९ | १०२३२ | ५३५५ | ४८७७ |
| १० | ५०० | १४९६ | ९८ | २०९३ | २०९३ | २६४ | २९९ | ३३७ | ३७७ | २१८ | १४९६ | १२३२६ | ६८५१ | ५४७५ |
| ११ | ५०० | १६९६ | १०९ | २३०६ | २३०६ | २६४ | २९९ | ३३७ | ३७७ | ४१९ | १६९६ | १४६३१ | ८५४७ | ६०८४ |
| १२ | ५०० | १८९३ | १२२ | २५१५ | २५१५ | ४६१ | २९९ | ३३७ | ३७७ | ४१९ | १८९३ | १७१४६ | १०४४० | ६७०६ |
| १३ | ५०० | २०९७ | १३४ | २७३१ | २७३१ | ४६१ | ५०३ | ३३७ | ३७७ | ४१९ | २०९७ | १९८७७ | १२५३६ | ७३४० |
| १४ | ५०० | २३०६ | १४७ | २९५३ | २९५३ | ४६१ | ५०३ | ५४६ | ३७७ | ४१९ | २३०६ | २२८२९ | १४८४२ | ७९८७ |
| १५ | ५०० | २५१९ | १६० | ३१७९ | ३१७९ | ४६१ | ५०३ | ५४६ | ५९१ | ४१९ | २५१९ | २६००८ | १७३६२ | ८६४७ |
| १६ | ५०० | २७३७ | १७३ | ३४०९ | ३४०९ | ४६१ | ५०३ | ५४६ | ५९१ | ६३६ | २७३७ | २९४१८ | २००९८ | ९३२० |
| १७ | ५०० | २९५७ | १८६ | ३६४४ | ३६४४ | ६८२ | ५०३ | ५४६ | ५९१ | ६३६ | २९५७ | ३३०६२ | २३०५६ | १०००६ |
| १८ | ५०० | ३१८३ | २०० | ३८८३ | ३८८३ | ६८२ | ७२९ | ५४६ | ५९१ | ६३६ | ३१८३ | ३६९४५ | २६२३९ | १०७०६ |
| १९ | ५०० | ३४१४ | २१४ | ४१२८ | ४१२८ | ६८२ | ७२९ | ७७७ | ५९१ | ६३६ | ३४१४ | ४१०७३ | २९६५२ | ११४२० |
| २० | ५०० | ३६४९ | २२८ | ४३७७ | ४३७७ | ६८२ | ७२९ | ७७७ | ८२६ | ६३६ | ३६४९ | ४५४५० | ३३३०१ | १२१४९ |
| २१ | ५०० | ३८८८ | २४३ | ४६३१ | ४६३१ | ६८२ | ७२९ | ७७७ | ८२६ | ८७५ | ३८८८ | ५००८१ | ३७१८९ | १२८९२ |
| २२ | ५०० | ४१३३ | २५८ | ४८९० | ४८९० | ९२६ | ७२९ | ७७७ | ८२६ | ८७५ | ४१३३ | ५४९७१ | ४१३२२ | १३६४९ |
| २३ | ५०० | ४३८२ | २७३ | ५१५५ | ५१५५ | ९२६ | ९७८ | ७७७ | ८२६ | ८७५ | ४३८२ | ६०१२६ | ४५७०४ | १४४२२ |
| २४ | ५०० | ४६३६ | २८८ | ५४२४ | ५४२४ | ९२६ | ९७८ | १०३१ | ८२६ | ८७५ | ४६३६ | ६५५५१ | ५०३४० | १५२११ |
| २५ | ५०० | ४८९६ | ३०४ | ५७०० | ५७०० | ९२६ | ९७८ | १०३१ | १०८५ | ८७५ | ४८९६ | ७१२५१ | ५५२३६ | १६०१५ |
| २६ | ५०० | ५१६० | ३२० | ५९८१ | ५९८१ | ९२६ | ९७८ | १०३१ | १०८५ | ११४० | ५१६० | ७७२३२ | ६०३९६ | १६८३५ |
| २७ | ५०० | ५४३० | ३३७ | ६२६७ | ६२६७ | ११९६ | ९७८ | १०३१ | १०८५ | ११४० | ५४३० | ८३४९९ | ६५८२६ | १७६७२ |
| २८ | ५०० | ५७०५ | ३५३ | ६५५९ | ६५५९ | ११९६ | १२५३ | १०३१ | १०८५ | ११४० | ५७०५ | ९००५७ | ७१५३२ | १८५२६ |
| २९ | ५०० | ५९८६ | ३७१ | ६८५७ | ६८५७ | ११९६ | १२५३ | १३१२ | १०८५ | ११४० | ५९८६ | ९६९१४ | ७७५१८ | १९३९६ |
| ३० | ५०० | ६२७३ | ३८८ | ७१६१ | ७१६१ | ११९६ | १२५३ | १३१२ | १३७१ | ११४० | ६२७३ | १०४०७५ | ८३७९१ | २०२८४ |
| ३१ | ५०० | ६५६५ | ४०६ | ७४७० | ७४७० | ११९६ | १२५३ | १३१२ | १३७१ | १४३२ | ६५६५ | १११५४५ | ९०३५५ | २११९० |
| ३२ | ५०० | ६८६३ | ४२४ | ७७८६ | ७७८६ | १४९४ | १२५३ | १३१२ | १३७१ | १४३२ | ६८६३ | ११९३३१ | ९७२१८ | २२११४ |
| ३३ | ५०० | ७५५६ | ४४२ | ८४९८ | ८४९८ | १४९४ | १९४७ | १३१२ | १३७१ | १४३२ | ७५५६ | १२७८३० | १०४७७४ | २३०५६ |
| ३४ | ५०० | ९०७७ | ४६१ | १००३८ | १००३८ | १४९४ | १९४७ | २८३३ | १३७१ | १४३२ | ९०७७ | १३७८६८ | ११३८५१ | २४०१७ |
| ३५ | ५०० | १२७२५ | ४८० | १३७०५ | १३७०५ | १४९४ | १९४७ | २८३३ | ५०१९ | १४३२ | १२७२५ | १५१५७२ | १२६५७५ | २४९९७ |
| ३६ | ५०० | २४९९७ | ५०० | २५९९७ | २५९९७ | १४९४ | १९४७ | २८३३ | ५०१९ | १३७०५ | २४९९७ | १७७५७० | १५१५७२ | २५९९७ |
| | | १८००० | ७९९७ | २५९९७ | | | | | | | | | | |

## संघटिका प्रशिक्षण–४

# गटात पैसे खेळल्यामुळे...

नमुना गट : ✲ सभासद दरमहा बचत रु. २५/– ✲ सभासद दरमहा सेवाशुल्क दर लिहावा ✲ सभासद संख्या २०

नियम – ✲ एका वर्षासाठी एका सभासदास जास्तीत जास्त अर्थसाहाय्य रु. ५०० द्यावे. (सर्व सभासदांच्या महिन्याच्या बचतीची बेरीज)

✲ घेतलेल्या अर्थसाहाय्याची फेड रु. १००/– दरमहा प्रमाणे करावी. ✲ जिच्या अंगावर अर्थसाहाय्य नाही तिला आधी अर्थसाहाय्य द्यावे.

| महिना | बचत | सेवाशुल्क प्रत्येकीचे | येणे बाकी | परतफेड प्रत्यकीची | एकूण महिन्याची रोख जमा | अर्थसाहाय्य दिले | कोणाला दिले | महिन्यात किती जणींना दिले | आतापर्यंत एकूण किती महिलांना दिले |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ५०० | – – | | – | ५०० | ५०० | महिला १ | १ | १ |
| **एकूण** | **५००** | | | **५००** | | **१** | | **१** | |
| २ | ५०० | महिला १ १० | ४०० | १०० | ६१० | ३१० | महिला २ | | |
| | | | | | | ३०० | महिला ३ | | |
| **एकूण** | **५००** | **१०** | **४००** | **१००** | **६१०** | **६१०** | | **२** | **३** |
| ३ | ५०० | महिला १ ८ | ३०० | १०० | | | | | |
| | | महिला २ ६ | २०० | ११० | | ५०० | महिला ४ | | |
| | | महिला ३ ६ | २०० | १०० | | ३३० | महिला ५ | | |
| **एकूण** | **५००** | **२०** | **७००** | **३१०** | **८३०** | **८३०** | | **२** | **५** |
| ४ | ५०० | महिला १ ६ | २०० | १०० | | | | | |
| | | महिला २ ४ | १०० | १०० | | ४०० | महिला ६ | | |
| | | महिला ३ ४ | १०० | १०० | | ३०० | महिला ७ | | |
| | | महिला ४ १० | ४०० | १०० | | ३६० | महिला ८ | | |
| | | महिला ५ ६ | २०० | १३० | | | | | |
| **एकूण** | **५००** | **३०** | **१०००** | **५३०** | **१०६०** | **१०६०** | | **३** | **८** |
| एकूण ५ | ५०० | महिला १ ४ | १०० | १०० | | | | | |
| | | महिला २ २ | – | १०० | | ४०० | महिला ९ | | |
| | | महिला ३ २ | – | १०० | | ४५१ | महिला १० | | |
| | | महिला ४ ८ | ३०० | १०० | | ५०० | महिला ११ | | |
| | | महिला ५ ४ | १०० | १०० | | | | | |
| | | महिला ६ ८ | ३०० | १०० | | | | | |
| | | महिला ७ ६ | २०० | १०० | | | | | |
| | | महिला ८ ७ | २५० | ११० | | | | | |
| **एकूण** | **५००** | **४१** | **१२५०** | **८१०** | **१३५१** | **१३५१** | | **३** | **११** |
| ६ | ५०० | महिला १ २ | – | १०० | | | | | |
| | | महिला २ – | – | – | | ५०० | महिला १२ | | |
| | | महिला ३ – | – | – | | ५०० | महिला १३ | | |
| | | महिला ४ ६ | २०० | १०० | | ४५३ | महिला १४ | | |
| | | महिला ५ २ | – | १०० | | | | | |
| | | महिला ६ ६ | २०० | १०० | | | | | |
| | | महिला ७ ४ | १०० | १०० | | | | | |
| | | महिला ८ ५ | २०० | ५० | | | | | |
| | | महिला ९ ८ | ३०० | १०० | | | | | |
| | | महिला १० ९ | ३०० | १५१ | | | | | |
| | | महिला ११ १० | ४०० | १०० | | | | | |
| **एकूण** | **५००** | **५२** | **१७००** | **९०१** | **१४५३** | **१४५३** | | **३** | **१४** |

| महिना | बचत | सेवाशुल्क प्रत्येकीचे | येणे बाकी | परतफेड प्रत्यकीची | एकूण महिन्याची रोख जमा | अर्थसाहाय्य दिले | कोणाला दिले | महिन्यात किती जणींना दिले | आतापर्यंत एकूण किती महिलांना दिले |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | ५०० | महिला १ | – | | | | | | |
| | | महिला २ – | – | – | | ५०० | महिला१५ | | |
| | | महिला ३ – | – | – | | ५१६ | महिला१६ | | |
| | | महिला ४ ४ | १०० | १०० | | ५०० | महिला१७ | | |
| | | महिला ५ – | – | | | | | | |
| | | महिला ६ ४ | १०० | १०० | | | | | |
| | | महिला ७ २ | – | १०० | | | | | |
| | | महिला ८ ४ | १०० | १०० | | | | | |
| | | महिला ९ ६ | २०० | १०० | | | | | |
| | | महिला १० ६ | २०० | १०० | | | | | |
| | | महिला ११ ८ | ३०० | १०० | | | | | |
| | | महिला १२ १० | ४०० | १०० | | | | | |
| | | महिला १३ १० | ४०० | १०० | | | | | |
| | | महिला १४ ९ | ४०० | ५३ | | | | | |
| एकूण | ५०० | ६३ | २२०० | ९५३ | १५१६ | १५१९ | | ३ | १७ |
| ८ | ५० | महिला १ | – | | | | | | |
| | | महिला २ – | – | – | | ५०० | महिला १८ | | |
| | | महिला ३ – | – | – | | ५०० | महिला १९ | | |
| | | महिला ४ २ | – | १०० | | ४०० | महिला २० | | |
| | | महिला ५ – | – | – | | १३१ | महिला १ | (पुन्हा कर्ज घेतले) | |
| | | महिला ६ २ | – | १०० | | | | | |
| | | महिला ७ २ | – | १०० | | | | | |
| | | महिला ८ २ | – | १०० | | | | | |
| | | महिला ९ ४ | १०० | १०० | | | | | |
| | | महिला १० ४ | १०० | १०० | | | | | |
| | | महिला ११ ६ | २०० | १०० | | | | | |
| | | महिला १२ ८ | ३०० | १०० | | | | | |
| | | महिला १३ ८ | ३०० | १०० | | | | | |
| | | महिला १४ ८ | ३०० | १०० | | | | | |
| | | महिला १५ १० | ४०० | १०० | | | | | |
| | | महिला १६ १० | ४०० | ११६ | | | | | |
| | | महिला १७ १० | ४०० | १०० | | | | | |
| एकूण | ५०० | ७६ | २५०० | १३१६ | १५३१ | १५३१ | | ४ | २१ |
| एकूण | ४००० | २९२ | | ४९३२ | ९२१२ | ९२१२ | | | |

यावरून असे दिसून येईल, की **८ महिन्यात प्रत्येकीस किमान एकदा तरी अर्थसाहाय्य मिळाले आहे.** ८ महिन्यात प्रत्येकीची बचत रु. २०० जमा झाली. **बचतीच्या दीडपटीपेक्षा जास्त रक्कम, प्रत्येकीने ८ महिन्यात वापरली.** (किमान ३०० ते ५१६) गटात बचतीचे रु.४००० व सेवाशुल्काचे फी रु. २९२ जमा असताना एकूण कर्ज रु. ८९५१ वाटप झाले. याचा अर्थ **४६५९ रुपये पुन्हा पुन्हा वापरल्यामुळे (परतफेडीमुळे) उपलब्ध झाले.** (८९५१-४२८०=४६५९).

गटात ८ महिन्यात रु २९२ व्याज मिळाले. याचा अर्थ २९२ ÷ २० म्हणजे प्रत्येकीला २०० रुपयावर १४.६० रु. व्याज मिळाले. ८ व्या महिन्याच्या अर्थसाहाय्य वाटपानंतर १२ जणींकडे गटाचे पैसे आहेत. याचा अर्थ २० जणीं पैकी (६५%) गटाला आर्थिक लाभ मिळत आहे. उरलेल्या ७ पैकी ५ जणींच्या कर्जाची फेड पूर्ण झालेली आहे. व एकीला तर दुसऱ्यांदा कर्ज मिळाले आहे.

★★★★★

# जमाखर्च पत्रक बनवा

जुलै महिन्याचे जमा-खर्च पत्रक दिले आहे. त्याचा अभ्यास करून आपल्याला **ऑगस्ट महिन्याचे जमाखर्च पत्रक बनवायचे आहे.**

* या हिशोबात दरमहा प्रत्येकीने किती **बचत** द्यायची, या गटाचा **व्याजाचा दर** काय असेल **याचा अंदाज** आपण **जुलै महिन्याच्या जमा-खर्च पत्रकाचा अभ्यास करून त्यावरुन करायचा आहे.**
* ऑगस्टमध्ये सर्वजणी गटाला आल्या आहेत असे गृहित धरावे.
* प्रत्येकीचा **याच महिन्याचा परतफेडीचा हप्ता पुढील महिन्यासाठी धरावा.**
* क्र. १ च्या सुलोचना जगतापने ५०० रुपये फेड केल्यानंतर रु ५०० येणे बाकी आहे असे जुलै महिन्यात दिसते.
* जुलै महिन्यात जमलेल्या रु. ७,५८८/- पैकी वैशाली बोरकर क्र १९ हिला रु ७५००/- कर्ज दिले आहे ती दरमहा ७५०/- प्रमाणे १० हप्त्यामध्ये परत करणार आहे.

## जुलै

| क्र. | नाव | बचत | येणे बाकी | फेड | सेवाशुल्क | दंड | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुलोचना जगताप | ५० | ५०० | ५०० | २० | | ५७० |
| २ | शारदा मांढरे | ५० | १८०० | २०० | ४० | | २९० |
| ३ | वैशाली शिंदे | ५० | ४००० | ८०० | ९६ | | ९४६ |
| ४ | विमल गोगावले | | ३५०० | | | | |
| ५ | भारती जाधव | ५० | ७५० | १६०० | ४७ | | १६९७ |
| ६ | सविता मोरे | ५० | ५०० | १०० | १२ | | १६२ |
| ७ | रत्ना वाडकर | १०० | | ० | ० | ५ | १०५ |
| ८ | ताराबाई गोळे | ५० | ५५० | १५० | १४ | | २१४ |
| ९ | चांगुणा वाशिवले | ५० | | २०० | ४ | | २५४ |
| १० | बायजा खवले | ५० | ४०० | २०० | १२ | | २६२ |
| ११ | रंजना गोगावले | | ३०० | | | | |
| १२ | जना शेलार | ५० | ७००० | १००० | १६० | | १२१० |
| १३ | लक्ष्मी बोरकर | ५० | १५०० | ५०० | ४० | | ५९० |
| १४ | अलका सुर्वे | ५० | २०० | | ० | | ५० |
| १५ | जानकी नलावडे | ५० | ६०० | १०० | १४ | | १६४ |
| १६ | भागुबाई तांबट | ५० | ४०० | १०० | १० | | १६० |
| १७ | सुमन भालघरे | ५० | १८०० | २०० | ४० | | २९० |
| १८ | सुनंदा शिवरकर | १५० | ० | ३०० | १८ | २८ | ४९६ |
| १९ | वैशाली बोरकर | ५० | | | ० | | ५० |
| २० | सुशिला मेढेकर | ५० | १४०० | ० | २८ | | ७८ |
| | एकूण | १०५० | २५२०० | ५९५० | ५५५ | ३३ | ७५८८ |

जुलै महिन्याच्या हिशोबाचा अभ्यास करून ऑगस्ट महिन्याचे जमा-खर्च पत्रक कसे असेल ते इथं लिहा.

## ऑगस्ट

| क्र. | नाव | बचत | येणे बाकी | फेड | सेवाशुल्क | दंड | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुलोचना जगताप | | | | | | |
| २ | शारदा मांढरे | | | | | | |
| ३ | वैशाली शिंदे | | | | | | |
| ४ | विमल गोगावले | | | ५०० | | | |
| ५ | भारती जाधव | | | ७५० | | | |
| ६ | सविता मोरे | | | | | | |
| ७ | रत्ना वाडकर | | | | | | |
| ८ | ताराबाई गोळे | | | | | | |
| ९ | चांगुणा वाशिवले | | | | | | |
| १० | बायजा खवले | | | | | | |
| ११ | रंजना गोगावले | | | १०० | | | |
| १२ | जना शेलार | | | | | | |
| १३ | लक्ष्मी बोरकर | | | | | | |
| १४ | अलका सुर्वे | | | १०० | | | |
| १५ | जानकी नलावडे | | | | | | |
| १६ | भागुबाई तांबट | | | | | | |
| १७ | सुमन भालघरे | | | | | | |
| १८ | सुनंदा शिवरकर | | | | | | |
| १९ | वैशाली बोरकर | | | | | | |
| २० | सुशिला मेढेकर | | | २०० | | | |
| | **एकूण** | | | | | | |

ऑगस्ट महिन्याचे जमा - खर्च पत्रक असे असेल

## ऑगस्ट

| क्र. | नाव | बचत | येणेबाकी | फेड | सेवाशुल्क | दंड | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुलोचना जगताप | ५० | ० | ५०० | १० | | ५६० |
| २ | शारदा मांढरे | ५० | १६०० | २०० | ३६ | | २३६ |
| ३ | वैशाली शिंदे | ५० | ३२०० | ८०० | ८० | | ९३० |
| ४ | विमल गोगावले | १०० | ३००० | ५०० | १४० | ७५ | ८१५ |
| ५ | भारती जाधव | ५० | | ७५० | १५ | | ८१५ |
| ६ | सविता मोरे | ५० | ४०० | १०० | १० | | १६० |
| ७ | रत्ना वाडकर | ५० | | | | | ५० |
| ८ | ताराबाई गोळे | ५० | ४०० | १५० | ११ | | २११ |
| ९ | चांगुणा वाशिवले | ५० | | | | | ५० |
| १० | बायजा खवले | ५० | २०० | २०० | ८ | | २५८ |
| ११ | रंजना गोगावले | १०० | २०० | १०० | १२ | ११ | २२३ |
| १२ | जना शेलार | ५० | ६००० | १००० | १४० | | ११९० |
| १३ | लक्ष्मी बोरकर | ५० | १००० | ५०० | ३० | | ५८० |
| १४ | अलका सुर्वे | ५० | १०० | १०० | ८ | ४ | १६२ |
| १५ | जानकी नलावडे | ५० | ५०० | १०० | १२ | | १६२ |
| १६ | भागुबाई तांबट | ५० | ३०० | १०० | ८ | | १५८ |
| १७ | सुमन भालघरे | ५० | १६०० | २०० | ३६ | | २८६ |
| १८ | सुनंदा शिवरकर | ५० | | | | | ५० |
| १९ | वैशाली बोरकर | ५० | ६७५० | ७५० | १५० | | ९५० |
| २० | सुशिला मेढेकर | ५० | १२०० | २०० | २८ | | २७८ |
| | एकूण | ११०० | २६४५० | ६२५० | ७३४ | ९० | ८१७४ |

**जुलैच्या हिशोबावरून लक्षात येणाऱ्या गोष्टी**

* बहुतेकींची बचत रु. ५० असल्यामुळे गटाची बचत दरमहा रु. ५० असणार.
* **सुलोचनाने ५०० रुपये फेड केल्यानंतर रु. ५०० येणे बाकी दिसते. याचा अर्थ रु. २०/–** सेवाशुल्क १००० रुपयावर दिले, म्हणजे सेवाशुल्क दर **दरमहा २% असावा.**
* क्र ७ – रत्ना जून मध्ये आली नसावी कारण तिची बचत जुलैत रु. १००/– दिसते. ती जूनमध्ये आली नाही म्हणून तिने रु. ५/– दंड भरला, म्हणजे **बचत न भरल्यास दंड ५ रुपये असणार.**
* क्र १८ –सुनंदाने बचत १५० भरली याचा अर्थ ती २ महिने आली नाही. दरमहा बचत भरली नाही म्हणून दंड ५ रु. प्रमाणे बचतीचा दंड रु.१० तिने भरलेला आहे. त्या शिवाय तिने १८ रु. दंड भरलेला आहे ही सेवा शुल्काची रक्कम आहे याचा अर्थ **परतफेड हप्ता भरला नाही तर सेवाशुल्काला सेवाशुल्काइतका दंड आहे.** म्हणून १० + १८ = २८ दंड.

* **जुलै महिन्यात क्र. ४ विमल व रंजना क्र. ११ हजर नव्हत्या म्हणून त्यांचे २ महिन्याचे व्यवहार होतील.**

| क्र. | नाव | बचत | बचत दंड | सेवाशुल्क | सेवाशुल्क दंड | फेड | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | विमल गोगावले | १०० | **५** | **१४०** | **७०** | ५०० | ८१५ |
| ११ | रंजना गोगावले | १०० | **५** | **१२** | **६** | १०० | २२३ |
| १४ | अलका सुर्वे | ५० | ० | ८ | ४ | १०० | १६२ |
| १९ | वैशाली बोरकर | ५० | | **१५०** | | **७५०** | ९५० |
| २० | सुशिला मेढेकर | ५० | | २८ | ० | २०० | २७८ |

**जुलैत हजर होत्या पण....**

* **क्र १४ अलका–२ महिन्याचे** सेवाशुल्क **सेवाशुल्क दंड** रु. ४/–
* **क्र २० सुशिला**–सेवाशुल्क दंड नाही कारण तिने जुलैचे सेवाशुल्क भरले होते.
* **क्र १९ वैशाली बोरकर** ७,५०० **आर्थिक साहाय्य जे जुलैमध्ये घेतले त्याचे** सेवाशुल्क रु. १५० **विमल, रंजना आल्या नाहीत. म्हणून** २ महिन्याची बचत, सेवाशुल्क, सेवाशुल्क दंड असे धरले आहे, ऑगस्टचे पत्रक लिहीताना कुणी जुलै व ऑगस्ट अशी २ महिन्याची परतफेड धरली तरी चूक नाही.

★★★★★

# शिकवणारे अनुभव !

## १
## आर्थिक लाभामुळे गट सावरला...

बचत गटाच्या प्रत्येक बैठकीला गटातील सर्व सभासदांनी हजर असायलाच हवं. पण गट थोडा जुना झाला की खरंतर त्यातलं एकत्र जमण्यातलं नावीन्य थोडं कमी होतं, प्रासंगिक राहातं व आर्थिक घटकच अनेकदा प्रभावी ठरतो, असं होतं !

असाच एक गट होता. दरमहा रु. ५० बचत करायचा, २० जणींचा गट. दीड वर्ष झालं. नव्याचं नवेपण संपलं. गरजेपुरतं एकत्र जमणं सुरू झालं. पण गटाची प्रमुख भलतीच हुशार. तिनं सर्वांना गोळा केलं नि सांगितलं, "हे बघा, या महिन्यात मासिक बचत जमली रु. १०००, फेड झाली रु. ५००० आणि व्याज जमलं ५८० असे एकूण रु. ६५८०/- झाले.

"आज व्याज जमलं रु. ५८०/-, याचा अर्थ आपल्या गटाचं आजचं प्रत्येकीला मिळालेलं व्याज २९ रुपये आहे! (रु. ५८०/२० जणी=रु.२९/-) बघा, दिवसभर शेतात राबून जेमतेम आपण ३० रु. मिळवतो. इथं घरबसल्या फक्त व्याजाचा प्रत्येकीचा वाटा रु.२९ आलाय ! जरी तो आज मिळणार नसला तरी तोपण तुमचाच आहे. सांगून ठेवते, पुढच्या महिन्यात पूर्णवेळ गटात थांबला नाहीत तर फक्त त्या महिन्याच्या नफ्यातला तुमचा हिस्सा म्हणून मिळणारं असं व्याज मिळणार नाही! ते दंडाच्या कॉलममध्ये लिहून ठेवीन.

गट प्रमुखांनी हक्कानं सभासदांना दम दिला, म्हणून बघता बघता गट सावरला गेला. सर्वांची हजेरी पूर्णवेळ! मग सामाजिक बदल घडणाऱ्या चर्चा व्हायला लागल्या. कारण, बायकांचं गप्पा मारणं हेच तर भांडवल होतं!

## २
## अनुभवानं समज वाढते...

गावात नव्यानं गट सुरू झाले. संस्था कार्यकर्ती म्हणाली गट २% दरमहा व्याजाने चालवा. महिला म्हणाल्या, सावकाराचा दर ५% आहे. त्यापेक्षा कमी ठरवू म्हणजे ४%. गट सभासदांचाच म्हणून शेवटी ४% दरमहा असा कर्जाचा व्याजदर ठरला.मात्र त्यामुळे गट बँक लिंकेज प्रकल्पातून वगळला गेला. कारण बँकेला अंतर्गत दर ४% चालणार नव्हता. ३ वर्षे झाली. गटाचा हिशोब झाला. व्याज वाटप केले.

गट पुन्हा बसला. सभासद म्हणाले, चला आता व्याज दर २% करू. कार्यकर्ती म्हणाली, 'का ? सावकारानं दर उतरवला का?' तर गटप्रमुख समजुतीच्या स्वरात म्हणाली, 'नाही ताई, तेव्हा गटाची पहिलीच वेळ होती. त्यात संस्थेचा आग्रह गटाचे नियम बायकांनीच ठरवायचे. पैशाच्या कुणाच्या गरजा काय, आम्हाला कुठे माहिती होत्या? ३ वर्षात आम्हाला गटातल्या बायकांच्या गरजा कळल्या. कोणाला किती लागतं नि कोण कसं फेडतं, तेही कळलं. आता दर कमी करू, गटाची टक्केवारी कमी म्हणून कोणी उचलून जास्त टक्केवारीनं बाहेर दिलं तर आता मात्र लगेच बोभाटा होईल, याची खात्री वाटते'.

गटातल्या महिलांची समज आता वाढते आहे. त्यांनी स्वतः निर्णय करणं महत्त्वाचं. तरच त्या घेतलेल्या निर्णयाला जागतील !

## ३
## गट– एक अनौपचारिक शिक्षणाची संधी

एका संस्थेच्या काही गट प्रमुखांशी गप्पा मारायची संधी मिळाली. त्यांच्या गटांचं बँक लिंकेज होते. SGSY योजनेत त्यांना रु. २५,०००/– खेळतं भांडवल मिळाले होते. त्यांना प्रश्न विचारला.

सांगा पाहू ----

गावातला सावकार काय दरानं कर्ज देतो ?

त्यांनी लगेच उत्तर दिलं

५% किंवा ७% ते १०%

गट काय दरानं कर्ज देतो ?

२% किंवा ३%.

बँक काय दराने कर्ज देते ?

८.५% किंवा ९% ते ११ %

मग कोण स्वस्त ?

गट

आणि कोण महाग ?

बँक !

उत्तर ऐकून मला धक्काच बसला.

पण हेच त्या लोकांकडून शिकल्या होत्या. बोलताना लोक व्याजाचे आकडे सांगतात ते दरसाल दर शेकडा आहे का दरमहा हे कुठे सांगतात ? मग त्यांना विचारलं–

पण तुम्ही तर बँकेचे कर्ज घेतलंय ?

एकीनं दीर्घ निःश्वास सोडून उत्तर दिलं, 'हो ना !' मग निरागसपणे ती म्हणाली, 'काय करणार, सरकारच्या योजनेत आम्हाला घेतलंय ना ! सबसिडीतून मिळणाऱ्या फायद्यामुळेच बँक परवडते. म्हणून तर सरकारच्या योजनांना सबसिडी दिली जाते.'

'ती' नं मलाच 'आगाऊ' माहिती दिली.

ती तरी काय करणार ? तिला बँकेचा दर हा वार्षिक असतो, गट व सावकारीचा कर्जदर मात्र महिन्यात सांगतात हे कोण शिकवणार ? आणि असं काहीतरी विचारलं तर लोक हसतील याची मनात भीती असतेच.

बँक लिंकेज प्रशिक्षणामुळे तिला कळलं, की बँकेचा कर्जदर वर्षाचा असतो.

## ४
## अनुभवातून शिक्षण

भामा दरमहा गटात जास्तीचे पैसे आणायची आणि गटात जास्तीची बचत भरायची. तिला कार्यकर्तीनं पटवलं की बँकेत स्वतःचं खाजगी खातं काढून त्यात पैसे ठेवणे चांगलं. कार्यकर्तीच्या खूपच आग्रहानं ती बँकेत गेली. खात्याचा अर्ज आणला. चांगली नटून जाऊन फोटो काढले. नि उत्साहानं फोटो घेऊन गेली की बँकेत. पण खातं न काढताच परतली. विचारलं, तर म्हणाली 'बरं झालं भेटलीस. बुडता बुडता वाचले बघ!' म्हटलं, 'काय झालं?', 'अगं खात्याचा फॉर्म आणला तेव्हा तिथं मॅडम होती.' तिनं सारं समजावून दिलं. 'भारी उत्साहानं खातं काढायला गेले, तर तिच्या जागेवर 'बाबा' बसलेला. त्यानं सांगितलं, आता ती बाई या शाखेत नाही. तिची बदली झाली. बघ दिले असते पैसे, तर बुडले असते ना ?'

बँक ही एक नोंदणीकृत संस्था आहे. तिथं बाबा बसतो का बाई यावर ती चालत नाही, हे कोण बरं तिला सांगणार ? त्याचंही प्रशिक्षण द्यावं लागतं. आजपर्यंत सावकारीचाच व्यवहार बघणाऱ्या बायांना सावकाराचा मुलगाच सावकार हे न सांगता कळतं. पण बँक मॅनेजरच्या बायकोचा बँकेशी संबंध नाही, तिच्याकडे भरलेले पैसे बँकेत जमा होत नाहीत, हे तिला कोण सांगणार ?

अनुभवानंच सारं शिकायचं हेच खरं !

## ५

## बँकेबद्दल...

बचत गट बँकेशी जोडायचे ठरवले तेव्हा बायकांनी येणाऱ्या अडचणींमध्ये मुख्य अडचण सांगितली होती **बँकेची भीती वाटणे.** म्हणून सर्वेक्षण केले तर खालील गोष्टी समजल्या.

१. तिथे खूप शिकलेली लोकं असतात.

२. तिथे खूप कागदपत्रं भरावी लागतात.

३. ओळखीचं कोणीच नसतं, मग पैसे द्यायचे कसे नि मागायचे कसे ?

४. काम करणारा माणूस दिसत नाही, फक्त डोकं दिसतं! तेही कायम लिखाण करणारं.

५. खूप शांतता असते.

६. सहीशिवाय कामे होत नाहीत.

७. ओळख नसणाऱ्या पुरूषाशी पण बोलावे लागते.

## ६

## चोख व्यवहारासाठी माहिती घ्यावी..

बँक लिंकेज कार्यक्रमात संस्थेनं भाग घेतला. गटांना कर्ज मिळवून देण्याचे काम चालू होते. अचानक एका गटाबद्दल बँक मॅनेजरची तक्रार आली. गट परतफेड करत नाही. गटात चौकशी केली. गटाचे जमा–खर्च कागद पाहिले. तर बँक कर्ज परतफेड दिसली. क्षणभर प्रमुखाकडं शंकेनं विचारणा केली. तिनं बँकेत पैसे जमा केल्याच्या पावत्या दाखविल्या. बँकेत फोन करून विचारलं. मॅनेजरनं तपासलं, पैसे खात्यावर जमा नाहीत. मग गटप्रमुखांना पैसे भरलेल्या पावत्यांसह बँकेत नेलं. तेव्हा उलगडा झाला की गट प्रमुखांनी नेहमीप्रमाणे पैसे बचत खात्यात जमा केले. त्यांना माहितीच दिली नाही, की **कर्जाचं खातं वेगळं असतं. त्या खात्यात कर्जाची फेड जमा करायची** असते. व्यवहार करताना काळजीपूर्वक जबाबदारी घेऊन माहिती घेऊन काम केले पाहिजे. हे प्रमुखांना सांगावे लागते.

★★★★★

# अभिप्राय-पत्रक

कृपया खालील पत्त्यावर माहिती भरून पाठवावी.

प्रशिक्षकाचे नाव : –

किती वर्ष प्रशिक्षक म्हणून काम करता आहात ?

पत्ता : –

दूरभाष क्रमांक : –

संस्थेचे नाव : –

पुस्तिकेविषयी कोणी सांगितले ? : –

पुस्तिका कुठून घेतली ? : –

वापरासंबंधी दिलेल्या सूचना पुरेशा वाटतात का ? : –

काय उपयुक्त वाटले ? : –

अवघड काय वाटले ? का ? : –

अजून कुठल्या मुद्यांवर असे प्रशिक्षणसाहित्य तयार व्हावे असे वाटते ? : –

टप्पा १/ २/३/ पातळी बद्दल काय वाटले ? : –

महत्वाच्या वाटणाऱ्या इतर गोष्टी : –

कृपया खालील पत्यावर वरील माहिती भरून पाठवावी. एकापेक्षा जास्त प्रशिक्षकांनी हे साहित्य वापरले असल्यास प्रत्येकाने अभिप्राय स्वतंत्रपणे भरून पाठवावा. असे पाठवणाऱ्यास अशा प्रकारच्या पुढील पुस्तिकेची माहिती थेट देणे सोपे जाईल व पुढील आवृत्ती सुधारण्यास निश्चित मदत होईल. तुमच्याही अनुभवाची भर यात पडेल.

धन्यवाद !

**सुवर्णा गोखले, बागेश्री पोंक्षे**

ज्ञान प्रबोधिनी, ५१० , सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

प्रशिक्षणातील नोंदवण्याजोगे अनुभव अवश्य इथे लिहावे.

# ज्ञान प्रबोधिनी ग्रामविकसन प्रभाग
### ४० वर्षांची वाटचाल



## पाणी

- गावकऱ्यांच्या श्रमदानातून विहीर - खोदाई हा प्रारंभबिंदू
- हातपंप उभारणी तंत्रज्ञान व दुरुस्तीबाबत युनिसेफशी साहचर्य
- पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्प : कपार्ट, नवी दिल्ली द्वारे १६,००० हेक्टरवर काम सुरू.
- टाटा समूहप्रणीत 'सुजल' फिल्टरचे उत्पादन-प्रशिक्षण
- जलस्वराज्य प्रकल्प : लोकसहभागासाठी अधिकाऱ्यांचे क्षमता विकास प्रशिक्षण
- खारपड जमीन विकास प्रकल्प व भूजल जाणीव जागृती मेळावे



## आरोग्य

- २३६ खेड्यांतील सव्वा दोन लाख लोकसंख्येत कुष्ठरोग निवारणाचे कार्य, कुटुंबात राहिलेल्या रुग्णांचे प्रमाण बहुऔषधी उपचारांनी दर दहा हजारी ३८ वरून २ च्या आत
- दुर्गम भागात माता व बालके आरोग्य प्रकल्प, ग्रामीण महिलांना आरोग्य प्रबोधिका प्रशिक्षण
- औषधी वनस्पतींची लागवड,
- नेत्रचिकित्सा व उपचार शिबिरे




## ऊर्जा

- ४,००० हून अधिक बायोगॅसची ४ जिल्ह्यांत उभारणी
- शौचालये व बायोगॅस एकत्र जोडण्याचा आदर्श गाव नमुना
- विद्यार्थी वसतिगृहांसाठी १० व २० घनमीटर क्षमतेचे बायोगॅस संयंत्र
- सौर ऊर्जेच्या उपकरणांचे प्रात्यक्षिक



## स्त्री शक्ती प्रबोधन

- दारूबंदी आंदोलनातून एकत्र आलेल्या महिलांचे २७५ बचतगट सुरू.
- निर्वाचित महिला सदस्यांना पंचायत-राज प्रशिक्षण
- व्यक्तिमत्वविकास, नेतृत्व विकास यासाठी निरंतर प्रशिक्षणे चालू



## शेती सुधारणा

- चारसूत्री भातशेतीचे प्रात्यक्षिक, एकात्मिक सेंद्रिय-रासायनिक शेतीचा प्रसार
- केंद्रशासनाच्या मदतीने हरितगृह उभारणी, गांडूळखत प्रशिक्षण, पशुसंवर्धन प्रकल्प
- जैव तंत्रज्ञान : केळी व ऊस यांचे ऊतिसंवर्धन
- फळबाग लागवड व प्रक्रिया प्रशिक्षण

**पाणी, ऊर्जा,**
**हाताला काम ।**
**संख्या-शिक्षण,**
**संघटित ग्राम ॥**



## उद्योजकता विकास

- घायपाताचा वाख व बांबूपासून गृहोपयोगी वस्तूंचे उत्पादन-प्रशिक्षण
- अहमदाबाद येथील संस्थेच्या मदतीने ग्रामीण उद्योजकता प्रशिक्षण वर्ग
- ३५०० युवक व महिलांचे ३५ प्रकारच्या व्यवसायांचे कौशल्य प्रशिक्षण
- १,२०० तरुणांना औद्योगिक प्रशिक्षण



## स्थानिक नेतृत्व विकसन

- ५० गावांमध्ये सरपंच व ग्रामपंचायत सदस्यांचे प्रशिक्षण
- जिजामाता सहविचार केंद्र
- पाणी समित्यांचे संघटन, अभ्याससहली व तांत्रिक प्रशिक्षण
- विद्यार्थ्यांच्या क्रीडा-स्पर्धा व क्रीडा - प्रात्यक्षिके
- ग्रामीण प्रज्ञा व किशोरी विकास प्रकल्प
- ३ ठिकाणी औपचारिक शिक्षणाची ग्रामीण केंद्रे
- गीते, पथनाट्ये, नाटके, पुस्तिका व चित्रफिती यांची निर्मिती व प्रसार

**कार्यक्षेत्रे** - पुणे जिल्हा (शिवगंगा व गुंजवणी खोरे - ता. हवेली, भोर, पुरंदर, वेल्हे; साळुंब्रे-ता. मावळ.), शिरवळ (जि. सातारा), रत्नागिरी, अंबाजोगाई( जि. बीड), हराळी ( जि. उस्मानाबाद), वाशिम, हिंगोली

शिक्षण, संशोधन, **ग्रामविकसन**, आरोग्य, संघटन

**ज्ञान प्रबोधिनी** ग्राम विकसन विभाग
५१०, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० ☎ (०२०) २४४९ ११५७, २४२० ७०००, २४२० ७१६२

# पैसे असे खेळतात.....

सखुबाईकडं १० रुपयाची नोट होती. तिला पाहुण्यांसाठी सरबत करायचं होतं.
**१० रुपयाची नोट देऊन** पारुकडनं तिनं **४ लिबं खरेदी केली.**
पारुनं तिच १० रुपयाची नोट भिमाला दिली आणि दळण
घेऊन आली. भिमेचं झंपर राधाकडं शिवायला दिलं होतं.
तेच **१० रुपये तिनं राधाला दिले आणि झंपर घेतलं.**
**राधाने ते १० रुपये चहासाठी साखर आणायला** वापरले तेव्हा ते दुकानदार
**सुजाताकडे** गेले. म्हणजे बघा, **१० रुपयाची नोट एकच होती,**
पण त्यातनं सखु, पारु, भिमा, राधा अशा ४ जणींची खरेदी झाली.
आणि सुजाताकडं १० रुपये जमा झाले.
**नोट फिरत राहिल्यामुळे ४० रुपयांची गरज भागली आणि**
**१० रुपयाची नोट हाताशी शिल्लक राहिली. १० रुपयाची नोट**
**फिरत राहिल्यामुळे पुढेही अनेक जणींची गरज भागवेल.**
**यालाच म्हणायचे पैसे खेळते राहणे.** आपापसात व्यवहार करण्याचा
हाच उपयोग असतो . **बचत गटाच्या व्यवहारामुळंही अगदी असंच होतं!**
**गरज अनेकींची भागते आणि पैसे गटातच राहतात.**




**ज्ञान प्रबोधिनी** ग्राम विकसन विभाग
५१०, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० (०२०) २४४९ १९५७, २४२० ७०००, २४२० ७१६२